अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार,दि. १२ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

परिवहनच्या 'त्या' व्हॉल्वो बसगाड्या विका किंवा चालवा; आयुक्तांचे आदेश

सोलापूर : महापालिका परिवहन उपक्रमाकडील त्या दहा वॉल्वो बसेस विका किंवा दुरुस्त करून चालवा, असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

केंद्र शासनाच्या जे. एन. एन. यु. आर. एम. या योजनेंतर्गत काही वर्षांपूर्वी सोलापूर महापालिकेला बसेस मिळाल्या होत्या मात्र काही बसेस चेसी क्रॅक व इतर कारणास्तव वादग्रस्त ठरल्या. बंद अवस्थेत पडून आहेत. या बसेस धुळखात पडून आहेत. त्या बंद अवस्थेत ठेवल्याने मोठे नुकसान होत आहे. यामध्ये १० वॉल्वो बसेसचाही समावेश आहे. या दहा वॉल्वो बसेस विकून टाका किंवा महापालिका परिवहन उपक्रमासाठी दुरुस्त करून चालवा, असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्तांनी महापालिका परिवहन उपक्रमाचे उपव्यवस्थापक तथा सहाव्यक आयुक्त श्रीराम पवार यांना दिले आहेत. या १० वॉल्वो बसेसची नेमकी स्थिती कशी आहे? त्याची तपासणी करावी. दुरुस्ती करून विकाव्यात किंवा शाळा, महाविद्यालय अथवा एखाद्या कंपनीला संपर्क करून चालविण्यास द्याव्यात. महापालिका परिवहन उपक्रमाकडे शक्य झाल्यास वापराव्यात अशाही सूचना महापालिका आयुक्तांनी केल्या आहेत.

ठाकरे धगधगती मशाल पेटवणार, शिंदे हातात ढाल-तलवार घेणार

सुराज्य/सोलापूर

हाडाची काडी करून बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केलेली शिवसेना फुटली. फुटलेल्या शिवसेनेने शिवसेनेचे निवडणूक चिन्हही गोठवले. आता उरलीसुरली शिवसेना घेऊन उध्दव ठाकरे पुन्हा एकदा जय महाराष्ट्र म्हणत बाळासाहेबांच्या विचारांची मशाल पेटवण्यासाठी सज्ज झालेले असतानाच निवडणूक आयोगाने फुटलेल्या गटाला 'ढाल-तलवार' चिन्ह बहाल केले आहे. त्यामुळे येत्या काळात एकनाथ शिंदे हाती ढाल-तलवार घेऊन धगधगत्या मशालीचा सामना करताना दिसणार आहेत.

मुंबईतील अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून शिंदे गटाला ढाल-तलवार' चिन्ह देण्यात आले आहे.

सोमवारी निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला 'मशाल' हे चिन्ह दिले होते. शिंदे गटाने दिलेली तिन्ही चिन्हे रद्द करत मंगळवारपर्यंत नवीन तीन चिन्हे पाठवण्यास सांगितले होते. त्यातून निवडणूक आयोगाने 'ढाल-तलवार' हे चिन्ह शिंदे गटाला म्हणजे बाळासाहेबांच्या शिवसेनेला बहाल केले आहे.

- **दोन ई-मेल, सहा चिन्हे :** दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाने निवडणूक चिन्हांसंदर्भात दोन स्वतंत्र ई-मेल निवडणूक आयोगाला पाठवले होते. दोन्ही ई-मेलमध्ये प्रत्येकी तीन नवीन चिन्हांचा पर्याय सुचवला होता. यामध्ये ढाल-तलवार, तळपता सूर्य आणि पिंपळाचे झाड, रिक्षा, शंख आणि तुतारी असे पर्याय देण्यात दिले होते.
- **आता परफेक्ट काम झाले :** निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. ढाल-तलवार ही शिवसेनेची जुनीच निशाणी आहे. आपली बाळासाहेबांची शिवसेना आहे. ही मराठमोळी निशाणी आहे. त्यामुळे आता परफेक्ट काम झालेले आहे. ढाल-तलवार ही छत्रपती शिवरायांची आणि त्यांच्या मावळ्यांची निशाणी आहे, त्यामुळे ती अगोदरच सर्वत्र पोहचलेली आहे.

  - एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री)
- **पाठीत खुपसण्यासाठी दिले शस्त्र :** शिंदे गटाला पाठीत खुपसण्यासाठी काहीतरी शस्त्र पाहिजे होते, ते शस्त्र त्यांना आता देण्यात आले आहे. त्यांचे जे चाणक्य (भाजप) आहेत, त्यांनी शिंदे गटाच्या हाती तलवार दिली असून ते खुपसण्यास सांगत आहेत. भाजप स्वत: ढाल घेऊन उभी आहे. यामध्ये काही विशेष नाही. त्यामुळे आम्हाला याचा काही फरकही पडत नाही.

  - खा. अरविंद सावंत (ठाकरे गटाचे नेते)
- **पंजाच्या पकडीतील मशाल पेटणार नाही :** उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी हिंदुत्वाचा विचार सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार स्वीकारला. त्यांचे हिंदुत्व बेगडी असल्याचे लोकांनी पाहिले आहे. त्यांनी मशाल घेतली असली तरी ती पंजाने पकडली आहे. राज्यात पंजाची मशाल कोणी स्वीकारणार नाही आणि ही मशाल पेटणारही नाही.

  - चंद्रशेखर बावनकुळे (भाजप प्रदेशाध्यक्ष)

मोदी चौकी परिसरात फायटर आणि दगडाने मारहाण

सोलापूर : राजकीय नेत्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यास सांगितल्याच्या कारणावरून फायटर, दगड आणि तलवारीने केलेल्या मारहाणीत अतुलकुमार राजेंद्र नागटिळक (वय ३५ रा. पापारामनगर) हे जखमी झाले ही घटना आज मंगळवारी दुपारच्या सुमारास मोदी चौकी परिसरात घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागटिळक हे मोदी चौकातून घराकडे जात असताना दीपक रतन गवळी यांना अक्षय पवार पोस्ट डिलीट करण्यास सांगितले. त्यावेळी मारुती गवळी, दिपक गवळी, राहुल सोनवणे, विशाल सोनवणे, आकाश सोनवणे, सुरज गवळी आदीने मारहाण केली अशी नोंद सदर बजार पोलिसात झाली आहे.

तांदूळवाडीजवळ एसटीच्या धडकेने टेम्पोमधील १५ प्रवासी जखमी

सुराज्य/सोलापूर

हैद्राबाद महामार्गावरील तांदूळवाडी जवळ पाठीमागून एसटी धडकल्याने टेम्पो मधील ७ महिला सह १५ प्रवासी जखमी झाले. हा अपघात मंगळवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडला. अपघातामधील सर्व प्रवासी बीबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर) येथील राहणारे असून ते सर्वजण चिवरी ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते.

ज्ञानोबा कोंडीबा शेंडगे वय ७०, रवींद्र कुरडे वय ४५, सुवर्णा कुरडे वय ४, कमल पवार वय ५७, अंगद देवकर वय ४०, समर्थ शिंगाडे वय १३, पूनम देवकर वय २७, सिध्दार्थ शिंगाडे वय ९, सुलोचना पवार वय २१, रेश्मा धोत्रे वय ३०, बबीता देवकर वय ४०, महादेव देवकर वय २२, आणि सुशीला महादेव देवकर वय ४०, सुवर्णा पवार (वय ६०), अंजली धोत्रे (सर्व रा. बीबीदारफळ ता.उत्तर सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत.त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते सर्वजण टेम्पोतून चिवरी येथून आपल्या गावाकडे निघाले होते.

तांदूळवाडी जवळ पाठीमागून केए३३-एफ-०५३० या क्रमांकाचे एसटी धडकल्याने टेम्पो मधील सर्व प्रवासी जखमी झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून पेशंट शुध्दीवर आहेत.

दिलीप मानेंना भाजपमध्ये येण्याचे आमंत्रण; शिवसेना प्रवेशाचा निर्णय चुकल्याची कबुली

सुराज्य/सोलापूर

तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर) येथील सिध्दनाथ शुगर मिल्स साखर कारखान्याच्या गाळप हंगामाचा शुभारंभ तर झाला शिवाय या कार्यक्रमादरम्यान आ. जयकुमार गोरे आणि माजी आ. दिलीप माने यांच्यात राजकीय जुगलबंदीत रंगली. या जुगलबंदीत आ. गोरे यांनी माने यांनी मी २०२४ मध्ये पुन्हा विधानसभेत जाईन, तेव्हा माने तुम्ही माझ्यासोबत असावेत. ती इच्छा कशी पूर्ण करायची, हे मला इथली काहीच कल्पना नाही. त्यामुळे मी बाकीच्या विषयावर काही बोलणार नाही. गरज भासली तर आमच्या पक्षात बाकीच्या सर्व व्यवस्था करायला, आम्ही कुठं कमी पडणार नाही, असे सांगत त्यांनी माने यांना भाजप प्रवेशाचे आमंत्रण दिले. त्यामुळे आगामी काळात माने यांच्या राजकीय प्रवेशाबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण येणार आहे.

कारखान्याच्या गाळप हंगामाचा शुभारंभ भाजप आमदार जयुकमार गोरे आणि राष्ट्रवादीचे नेते सदाशिव पाटील यांच्या हस्ते मोळी टाकून करण्यात आला. या कार्यक्रमात माने यांनी आ.गोरे यांच्याबरोबर असलेले मैत्रीचे किस्से सांगितले. माने म्हणाले, मी, सदाशिव पाटील आणि आ. गोरे चांगले मित्र आहोत. सदाशिव आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये, तर जयकुमार गोरे हे भाजपमध्ये आहेत. माझा अजून काय पत्ता नाही. बघू पुढे. एकदा घाई करून चूक झाली आहे,' असे वक्तव्य करून २०१९ मध्ये शिवसेना प्रवेशाचा निर्णय चुकला, अशी कबुली दिली. त्यावर आमदार गोरे म्हणाले की, माने मी सांगेन की, राजकारणात आपले अस्तित्व महत्त्वाचे असते.

कुणाचे कितीही गणित असले तरी राजकारणात निवडून येणारे गणितच आपण मांडायचे असते. आता तुम्ही काही करा; पण निवडून येणारे गणितच मांडा. कुठे (कोणत्याही पक्षात) मांडायचे तिथे मांडा; पण निवडून येणारे गणित मांडा. आपण कोठूनही या; मात्र विधानसभेत या. तशी गरज भासली तर आमच्या पक्षात बाकीच्या सर्व व्यवस्था करायला आम्ही कुठे कमी पडणार नाही.

माने राजकारणात गडबड, घोटाळे होत असतात. पण, धाडस केल्याशिवाय काहीच मिळत नाही. अपयश येते, पण त्याचा फार विचार करायचा नाही. मी भाजपमध्ये आहे, त्यामुळे मी तुम्हाला भाजप प्रवेशाचे निमंत्रणच देईन, माझी काही अडचण नाही. पण, मी काय ते सांगायला येथे आलो नाही. मी भाजपमध्ये काम करतो, तेव्हा मला मनापासून आनंद होतो. खूप चांगल्या पद्धतीचा अनुभव मला भाजपमध्ये आल्याचे ते म्हणाले. आ. गोरे यांनी दिलीप माने यांना दिलेल्या आमंत्रणामुळे माने यांच्या पुढील राजकीय कारकिर्दीबाबत पुन्हा एकदा सस्पेन्स वाढला आहे.

माने कोठूनही या; मात्र विधानसभेत या

आ. गोरे म्हणाले की, जाता जाता एवढेच सांगेन की, माझी एक इच्छा आहे, मी २०२४ मध्ये पुन्हा विधानसभेत जाईन, तेव्हा माने तुम्ही माझ्यासोबत असावेत. ती इच्छा कशी पूर्ण करायची, हे मला इथली काहीच कल्पना नाही. त्यामुळे मी बाकीच्या विषयावर काही बोलणार नाही. पण, आपण कोठूनही या; मात्र विधानसभेत या. तशी गरज भासली तर आमच्या पक्षात बाकीच्या सर्व व्यवस्था करायला, आम्ही कुठे कमी पडणार नाही.

पनाशमध्ये काही गैर नसल्याचा उच्च न्यायालयाचा निर्वाळा

▪ गॅलोर कंपनीला दिलेल्या सर्व नोटिसा रद्द; खरेदी विक्रीवरील बंदीही उठवली

सोलापूर : विजापूर रोडवरील पनाश इमारतीच्या बांधकामा बाबत महापालिकेने गॅलोर कंपनीला बजावलेल्या तीनही नोटिसा उच्च न्यायालयाने रद्द केल्या आहेत. पनाशच्या फ्लॅटची खरेदी विक्री थांबविण्याचे आदेश ही रद्द केले आहेत.

महापालिकेने पनाश इमारतीचा बांधकाम परवाना देताना करार केला होता. या करारानुसार महापालिकेला अपेक्षित जागा मिळाली नाही, गॅलोर कंपनीने ९ व्या मजल्यावरील बांधकाम करताना जादा एफएसआय वापरला असे म्हणत आयुक्त पी. शिवशंकर यांनी कंपनीला बांधकाम परवाना का थांबू नये अशी नोटीस बजावली होती. याविरुद्ध कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. डी. धनुका आणि कमल काथा यांच्यासमोर सुनावणी झाली.

महापालिकेने एमआरटीपी ॲक्ट ५१ नुसार गॅलोर कंपनीच्या मालकांना नोटीस बजावली होती. पनाशच्या जागेत महापालिकेला ४८६.४७ स्क्वेअर मीटर जागा मिळाली आहे. त्याऐवजी १६३५.४५ स्क्वेअर मीटर देण्यात यावी असे आदेश आयुक्तांनी दिले होते. उच्च न्यायालयाने आयुक्तांचा हा आदेश फेटाळून लावला आहे. महापालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी २०१९ मध्ये ४९६.४७ स्क्वेअर मीटर जागा घेण्याचा निर्णय न्यायालयाने योग्य ठरविला आहे. यात कोणत्याही प्रकारे व्याख्या तपासण्याची आवश्यकता नाही असेही न्यायालयाने म्हटले आहे. महापालिका आयुक्तांनी पनाश मधील फ्लॅटची खरेदी विक्री थांबविण्याचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी खरेदी विक्री थांबवली होती. ही खरेदी विक्री थांबविण्याचे पत्र देणे आणि आदेश देण्याचा अधिकार मनपा आणि जिल्हा प्रशासनाला नसल्याचा निर्वाळा ही न्यायालयाने दिला आहे. पनाशमधील फ्लॅटच्या खरेदी विक्रीवरील बंदीही उठवली आहे. गॅलोर कंपनीकडून ॲड. युवराज पाटील, ॲड. प्रदीप दुबे यांनी बाजू मांडली. महापालिकेतर्फे ॲडवोकेट विश्वनाथ पाटील यांनी बाजू मांडली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

घोटाळे अलिकडे खूप स्मार्ट झालेत!

कल्याण
689-38-567

मेन बाजार
156-27-115

उजनी धरणातून ५१ हजार क्युसेकचा विसर्ग

▸ भीमा नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा

सुराज्य/पंढरपूर

पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे उजनीतून ५१ हजार क्युसेक पाणी भीमा नदीत सोडण्याची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू झाली आहे. त्यामुळे नदीकाठी सतर्कतेचा इशारा उजनी धरण व्यवस्थापनाने दिला आहे.

मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात परतीच्या पावसाचा चांगलाच जोर असून उजनी पाणलोट क्षेत्रातही जोरदार पावसाने हजेरी लावल्याने क्षमतेने भरलेल्या उजनी धरणातून सायंकाळी सहा वाजता ५० हजार क्युसेकने पाणी सोडण्यात आले आहे. उजनी धरणावर मंगळवारी २५ मिलिमीटर पावसाची नोंद आहे. याचबरोबर भीमा खोऱ्यातील अनेक धरणांवर चांगला पाऊस झाला आहे. खडकवासल्यावर ७०, आंध्रा ३७, पवना १८,मुळशी १८, टेमघर २५ मि.मी. अशी नोंद आहे.

उजनी पाणलोट क्षेत्रातील पावसाने धरणातील पाणी पातळीत वाढ होत असल्याने मंगळवारी सकाळपासून भीमेत सोडण्यात येणारा विसर्ग सतत वाढवण्यात आला. सायंकाळी सहा वाजता तो ५० हजार क्युसेक करण्यात आल्याने आता नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. तसेच पंढरपूरचा जुना दगडी पूल बुधवारी पाण्याखाली असणार आहे. उजनी धरण १११ टक्के उपयुक्त पाणी पातळी भरले असल्याने यात आता पाणी साठवणूक करण्यासाठी जागा नसल्याने पाणी भीमा नदीच्या पात्रात सोडले जात आहे. धरणात एकूण पाणीसाठा हा १२३ टीएमसी असून यातील उपयुक्त पाणी हे ५९ टीएमसी इतके आहे.

आपत्ती व्यवस्थापन समिती गाफील

आज सकाळपासून उजनी धरणातून पाणी सोडण्यात येत आहे. संध्याकाळी ६ वाजल्यापासून ५१ हजार क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. असे असताना पंढरपूर तालुका आपत्ती व्यवस्थापन समितीने याबाबत कोणतीही माहिती प्रसारित केली नाही. तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा ०२१८६-२२३५५६ या फोन नंबरवर माहिती घेण्यासाठी संपूर्ण साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

पोलीस तैनात करणार : भीमा नदीच्या पाण्याची पातळी वाढणार असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन समितीने अद्याप पोलीस प्रशासनाला दिली नाही. मात्र उद्या पंढरपुरातील जुना दगडी पूल, बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्यामुळे बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

- विक्रम कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी

मंदीची सूचना

कोरोनानंतर अर्थव्यवस्थेचा गाडा सुरळीतपणे पळत असतानाच जगावर पुन्हा एकदा आर्थिक मंदी ओढवणार असल्याची शक्यता वर्तवली गेली आहे. त्यामुळे हा गाडा पुन्हा त्यात रुतला जाणार की काय? ही एक नवी भीती विश्वापुढे उभी राहिली आहे. पुढील वर्षाच्या मध्यापर्यंत अमेरिका आणि जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या दिशेने जाऊ शकते, असे भाकीत जेपी मॉर्गन चेस ॲण्ड कंपनीचे मुख्य कार्यकारी जेमी डिमन यांनी वर्तवले आहे. चलनवाढ, व्याजदरातील वाढ, रशियाचा युक्रेनवरील हल्ला आणि फेडरल रिझर्व्हच्या परिमाणात्मक कठोर धोरणाचे परिणाम हे संभाव्य मंदीचे संकेत असल्याचे ते म्हणतात. या अतिशय गंभीर गोष्टी आहेत ज्यामुळे अमेरिका आणि जगाला त्याचे धक्के बसू शकतात. युरोप आधीच मंदीच्या गर्तेत आहे आणि ते आत्तापासून सहा ते नऊ महिन्यात अमेरिकेला मंदीच्या टप्प्यात जाण्याची शक्यता आहे, असेही डिमन म्हणाले. अमेरिकेतील मोठ्या बँका शुक्रवारपासून त्यांच्या तिसऱ्या तिमाही कमाईचा अहवाल देणार आहेत, त्याच्या पार्श्वभूमीवर डिमन यांचे भाकीत अतिशय महत्त्वाचे मानले जाते. यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीला गुंतवणूकदारांना आर्थिक चक्रीवादळासाठी सज्ज राहण्याचा सल्ला डिमन यांनी दिला होता. आज जगाच्या शेअर बाजारात सतत चढ-उतार होत असल्याने डिमन यांची भविष्यवाणी खरी ठरते की काय? असे जगाला वाटू लागले आहे. जूनमध्ये, गोल्डमन सॅक्सने पुढील वर्षभरात अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदीत येण्याची शक्यता ३० टक्के वर्तवली होती, तर मॉर्गन स्टॅन्ले इथल्या अर्थशास्त्रज्ञांनी पुढील १२ महिन्यांसाठी मंदीची शक्यता सुमारे ३५ टक्के व्यक्त केली होती.

जागतिक बँकेचे अध्यक्ष डेव्हिड मालपास आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टालिना जॉर्जिव्हा यांनीही जागतिक मंदीच्या वाढत्या धोक्याचा इशारा दिला होता. २०२३ मध्ये जगातील अनेक देशांना आर्थिक मंदीचा सामना करावा लागू शकतो, असे त्या म्हणाल्या होता. तर रशियाच्या युक्रेनवरील हल्ल्यानंतर महागाईची समस्या कायम असल्याचे सांगितले होते. दोन वर्षांत जगभरातील अर्थव्यवस्था ठप्प झाल्या होत्या. कोरोनाचा जोर ओसरल्यानंतर काही देशांच्या अर्थव्यवस्था आता कुठे हळूहळू पूर्वपदावर येत आहेत. अशातच मंदीचा दिला गेलेला इशारा हा चिंता करायला लावणारा आहे. मागील दोन वर्षांत जगभरातील अर्थव्यवस्था ठप्प झाल्या होत्या. इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि वर्ल्ड बँकेच्या वार्षिक बैठकीपूर्वी क्रिस्टालिना जॉर्जिव्हा म्हणाल्या की, 'लोकांच्या उत्पन्नात होणारी घट आणि वाढती महागाई याचा अर्थ अनेक देश आर्थिक मंदीचा सामना करत आहेत. पुढील वर्षी याचं प्रमाण आणखी वाढू शकते.' चौथ्या तिमाहीसाठी आर्थिक अंदाज कमी करू होऊ शकतो, असा अंदाज क्रिस्टालिना जॉर्जिव्हा यांच्या वक्तव्यावरून वर्तवला जातोय. रशियाने युक्रेनवर केलेला हल्ला, तेलाच्या वाढत्या किमती आणि खाद्यपदार्थांच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे. त्या तुलनेत लोकांचं उत्पन्न वाढलेलं नाही. क्रिस्टालिना जॉर्जिव्हा म्हणाल्या की, 'जगभरातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्थेची गती मंदावत आहे. अल्पावधीत परिस्थिती आणखी वाईट आणि बिकट होईल.' चीनमधील प्रॉपर्टी मार्केटमधील आर्थिक जोखीम वाढतच आहे. हे अतिशय चिंताजनक आहे. इंटरनॅशनल मॉनिटरी फंड म्हणजेच आयएमएनुसार, वाढत्या महागाईला नियंत्रणात ठेवण्यासाठी जगभरातील सेंट्रल बँकांना आपलं कठोर चलनविषयक धोरण कायम ठेवावं लागणार आहे. खाद्यपदार्थामध्ये होत असलेल्या वारंवार वाढीचा फटका उदयोन्मुख अर्थव्यवस्थेला बसत असल्याचं दिसत आहे. त्यामुळे त्या देशांवरील आर्थिक संकट वाढत आहे. कर्जाचा बोजा वाढतच जात आहे. क्रिस्टालिना जॉर्जिव्हा यांच्या मते जागतिक अर्थव्यवस्थेवर आलेलं हे संकट कायमस्वरूपी नाही. जगभरातील अनेक अर्थव्यवस्था यातून बाहेर पडतील. जगात मंदी आली म्हणून काय झाले? असे भारतीयांना म्हणून चालेल काय? जगाची मंदी ही आपल्यासाठी धोक्याची घंटाच समजायला हवी. आपली देश महागाईच्या चक्रात सापडला आहे. इंधनाचे दर अजूनही वधारलेलेच आहेत. खाद्यतेलाचे भावही गगनाला भिडले आहे. डाळींच्या किमती काय सांगतात? आता तर दिवाळी जवळ आलीय. त्यात महागाईचा अजून कहर दिसायला लागेल. केंद्र आणि राज्य सरकारांकडून लोकानुनय सुरूच आहे. त्यामुळे मंदीची झळ भारतालाही बसेल, यात शंकाच नाही.

शैक्षणिक

प्राचार्यपदाची कालमर्यादा

उच्च शिक्षणामध्ये महाविद्यालयांची सर्वांत मोठी भूमिका असून पदवी, पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधनाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या या संस्था आहेत. देशातील सर्व राज्यांमध्ये बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या मोठी आहे. ही महाविद्यालये मोठी करण्यामध्ये आणि त्याद्वारे उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यामध्ये महाविद्यालयाचा प्रमुख म्हणून प्राचार्यांची जबाबदारी मोठी असते. महाविद्यालयाला प्रगतिपथावर नेण्यामध्ये प्राचार्यांची भूमिका संघटक, आयोजक आणि व्यवस्थापकाची असते. प्राचार्य हे अत्यंत जबाबदारीचे पद असून प्राचार्यांना अनेक आघाड्यांवर काम करावे लागते आणि असे करत असताना समतोल सांभाळावा लागतो. महाविद्यालयाचा महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी, त्यांना शिकविणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, पालक, परिसरातील मान्यवर, संस्था, पदाधिकारी, विद्यापीठ यांच्याशी समन्वय साधून सर्वांच्या हिताचे निर्णय घ्यावे लागतात.

> **विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्राचार्यपदाचा पाच वर्षांसाठीचा किमान निश्चित कार्यकाळ निश्चित केल्याने या पदावर कार्य करू इच्छिणारे कमी होत आहेत. उच्च शिक्षण, त्याची गुणवत्ता आणि त्यासाठी महत्त्वाचे असणारे प्राचार्य पद याचा विचार याविषयी सकारात्मक बदल होणे गरजेचे आहे.**

गेल्या काही वर्षामध्ये राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या (नॅक) मूल्यमापनामुळे प्राचार्यांच्या जबाबदाऱ्या कित्येक पटीने वाढलेल्या आहेत. 'नॅक'च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाविद्यालय, विद्यार्थी, शिक्षक, समाज यांच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण करून महाविद्यालयाची श्रेणी वाढविणे हे मोठे कष्टाचे काम असते आणि त्यासाठी सर्वांना एका समान पातळीवर आणून त्यांच्यामध्ये एकतेची जाणीव निर्माण करून महाविद्यालयाला विकासाकडे नेण्यामध्ये प्राचार्याला सतत जागरूक रहावे लागते.

मात्र, गेल्या काही वर्षांतील प्राचार्यपदाच्या नेमणूक पद्धतीमध्ये झालेल्या बदलांमुळे प्राध्यापक प्राचार्यपदासाठी फारसे उत्सुक नसल्याचे दिसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्राचार्यपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ. प्राचार्य म्हणून नेमणूक झाल्यानंतर प्रथम पाच वर्षे आणि नंतर त्यांच्या कामाचा मागोवा घेऊन त्यांना पुन्हा पाच वर्षांसाठी नेमणूक करता येते; परंतु फक्त दहा वर्षांच्या कालावधीसाठी प्राचार्य म्हणून काम करता येते. असे असल्याने प्राध्यापक मंडळी प्राचार्य म्हणून येण्यास तयार नसतात. मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू एस. पी. त्यागराजन यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नेमली गेली आणि त्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्राचार्य पदासाठी पाच आणि दहा वर्षांचा कार्यकाळ ही नियमावली मांडली. पाच वर्षांच्या निश्चित काळासाठी नियुक्ती झाल्यानंतर महाविद्यालयाची संपूर्ण माहिती होऊन काम करायला सुरू करेपर्यंत ही पाच वर्षे संपतात. त्यामुळे अशा किमान निश्चित काळासाठी हे महत्त्वाचे पद देणे अत्यंत चुकीचे वाटते. उच्च शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा असताना या गोष्टीचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

याबरोबरच प्राचार्य वेतननिश्चिती, निवृत्तिवेतन फायदे असे अनेक प्रश्न प्राचार्यांसमोर आहेत. प्राचार्यपदाची नेमणूक या संदर्भात अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. त्यात महत्त्वाचे म्हणजे प्राचार्य म्हणून काम करीत असताना ज्याच्यावर सर्व महाविद्यालयाची धुरा असते त्यांना आर्थिक लाभ मिळत नाहीत. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे प्राचार्यांचा ग्रेड पे दहा हजार रुपये आहे. सातव्या

वेतन आयोगाप्रामणे ग्रेड पे दहा हजार रुपये असणाऱ्यांसाठी ॲकॅडेमिक लेव्हल १४मध्ये निश्चिती करणे अपेक्षित आहे; परंतु तसे न होता सातव्या वेतन आयोगामध्ये वेतन निश्चिती सहयोगी प्राध्यापकाप्रमाणे ॲकॅडेमिक लेवल १३ ए वेतनश्रेणीमध्ये केलेली आहे. त्यामुळे प्राचार्यांना सहयोगी प्राध्यापकाप्रमाणे पगार घ्यावा लागतो. ज्या महाविद्यालयांमध्ये पदवीधर विभाग अनुदानित आहे, त्याच महाविद्यालयातील प्राचार्यांना ॲकॅडेमिक लेव्हल १४मध्ये निश्चिती केली आहे. या नेमणुकीत असणारा अजून एक विरोधाभास म्हणजे नेमणूक जास्तीत जास्त दहा वर्षांपर्यंत म्हणजेच दोन कार्यकाळ उपलब्ध होऊ शकतात; पण परंतु धारणाधिकार (लीन) फक्त पाच वर्षांसाठी मिळतो. नंतरच्या कार्यकाळासाठी त्याला मूळ पदावरून राजीनामा द्यावा लागतो. आणि ही दुसरी पाच वर्षे संपल्यानंतर त्याला परत प्राध्यापक म्हणून येण्याचा मार्गही बंद झालेला असतो. प्राचार्यपदी नेमणूक झालेल्या प्राध्यापकाला 'प्रोफेसर' हे पद मिळत नाही. गोवा राज्याने प्राचार्य नेमणुकीपासून त्याला प्रोफेसर हे पद दिले आहे; परंतु महाराष्ट्रात अजून असा विचार झालेला नाही. 'यूजीसी'च्या शिफारशीनुसार किमान निश्चित कार्यकाळ ही संकल्पना सुरू करण्यामागे प्राचार्यपद इतर महत्त्वाच्या पदांना मानवी संसाधन पुरविणारे पद आहे; परंतु जर त्याला 'प्रोफेसर' पदावर निश्चिती केली गेली नाही तर त्या व्यक्तीला पुढे असणाऱ्या कोणत्याही पदांपर्यंत जाता येत नाही. याबरोबरच प्राचार्यांचे निवृत्तीचे वय याविषयीही स्पष्टता नाही. निवृत्तीचे वय ६२ की ६५ वर्षे या विषयी संदिग्धता असून, कोणत्या वर्षी प्राचार्य म्हणून रुजू होतो यावर ते अवलंबून असते. खरे तर प्राचार्याचे करिअर पंधरा वर्षे उशिरा सुरू होते. त्यामुळे सरसकट त्याचे निवृत्तीचे वय ६५ वर्षे करावे अशी मागणी आहे.

प्राचार्य या पदासाठी इतरांपेक्षा अनेक प्रकारे काम करावे लागते. अनेक आघाड्यांवर सतर्क रहावे लागते. असे जास्तीचे काम करण्यापेक्षा 'प्रोफेसर' पद उपभोगावे, अशी मानसिकता असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातूनही अनेक जण अशा प्रकारे प्राचार्य म्हणून नेतृत्व करण्यासाठी तयार असतात; परंतु प्राचार्य पदासाठी समोर असलेले अनेक प्रश्न लक्षात घेऊन या वाटेकडे येणाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. उच्च शिक्षणातील गुणवत्ता राखण्यासाठी असे निर्णय घेतले जात असतील, तर नवीन कल्पना राबविण्यासाठी तरुण वयातील सक्षम लोक या पदाकडे येणार नाहीत आणि गुणवत्तेचा हेतू सफल होणार नाही. म्हणूनच ही पाच वर्षांची अट काढून टाकावी व कायमस्वरूपी प्राचार्य नेमावा. केंद्र सरकारचा प्रत्येक शैक्षणिक निर्णय राज्य सरकारकडून स्वीकारला जातोच असे नाही. मात्र, दुर्दैवाने प्राचार्य पदाच्या नेमणुकीचा हा निर्णय राज्य सरकारने स्वीकारला. हा निर्णय स्वीकारू नये म्हणून प्राचार्य फेडरेशन २०११पासून कार्यरत आहे. उच्च शिक्षण, त्याची गुणवत्ता आणि त्यासाठी महत्त्वाचे असणारे प्राचार्य पद याचा विचार याविषयी लवकरात लवकर सकारात्मक बदल होणे आवश्यक आहे.

- नितीन घोरपडे.

(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेचे सदस्य आहेत.)

जन्मशताब्दी समारोपानिमित्त

बालसाहित्यात शांताबाईंचं योगदान

ख्यातनाम मराठी लेखिका, कवयित्री शांताबाई शेळके यांच्या दीर्घ लेखन-कारकिर्दीत मराठी साहित्यनिर्मिती व साहित्यविचार यात अनेक स्थित्यंतरे झाली. अनुवादक, समीक्षा-स्तंभ लेखिका, वृत्तपत्र सहसंपादक म्हणून शांता शेळके यांनी साहित्यात मोलाची भर घातली आहे. आज १२ ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांच्या जन्मशताब्दीचा समारोप महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणी होत आहे त्यांच्या साहित्याचा मागोवा घेणारे लेखन.

शांताबाईंचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी सोलापूर जिल्ह्याला लागून असलेल्या पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे जनार्दन शेळके यांच्याकडे झाला. त्यानंतर त्यांनी पत्रकारिता, कथालेखन, अनुवाद, बालसाहित्य अशा अनेक क्षेत्रांत यशस्वीपणे मुशाफिरी केली. असे विविध प्रकारचे दर्जेदार साहित्य असणारी त्यांची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याचबरोबर त्यांनी व्यक्ती चित्रात्मक लेखनही केले. शांताबाई कवयित्री म्हणून अधिक प्रसिद्ध तर आहेतच पण. बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. मोठ्यांच्या कवितांबरोबरच लहान मुलांचे भावविश्व त्यांनी कवितांमधून साध्या-सोप्या शैलीत मांडले आहे. त्या म्हणतात, लहान मुलांसाठी कविता लिहिणे हे एक अवघड पण सुंदर आव्हान आहे. कवितेसंबंधीचे सारे ज्ञान, व्यासंग आणि पूर्वग्रह बाजूला ठेवून, एका निखळ, निर्मळ आणि अविकृत मनाने बालकवितेकडे जायला हवे.अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. 'तोच चंद्रमा', 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती', 'चित्रगीते' ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. नादलयींचे नेमके भान जपणारी सुलभ, प्रासादिक रचना हे त्यांच्या काव्य लेखनाचे एक महत्त्वाची वैशिष्ट्य होते. संतांचे अभंग, ओव्या, तसेच पारंपरिक स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संस्कार त्यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात.

शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे 'मेघदूत', 'चौघीजणी' त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म अशा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. म्हणूनच

हिरव्या हिरव्या गवतातून
आली लाट, गेली लाट
निळ्या निळ्या पाण्याचा
विसकटून गेला काठ

अशा तरल ओळी त्या लिहितात.

कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, चित्रपटगीते, समीक्षा, आत्मकथन, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत लेखन शांता शेळके यांनी केले असून वृत्तपत्र, संपादक तथापि कवयित्री आणि गीतकार म्हणून आजच्या पिढीतही विशेष प्रसिद्ध आहेत. पुण्याच्या हुजूरपागा शाळेतून शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात पुढील शिक्षण घेतले. एम.ए.च्या परीक्षेत मराठी हा विषय घेऊन ताात्यासाहेब केळकर सुवर्णपदक त्यांनी मिळविले. त्यानंतर मुंबई येथे अल्पकाळ आचार्य अत्रे यांच्या नवयुग साप्ताहिकात नोकरी केली. पुढे नागपूर आणि मुंबई येथील महाविद्यालयांतून मराठीचे अध्यापन केले.

शांताबाई शेळके यांनी जरी अनेक साहित्य प्रकार समर्थपणे हाताळले असले तरी, कविता लेखन हा त्यांच्या विशेष आवडीचा साहित्य प्रकार. 'असेन मी नसेन मी', 'वर्ष', 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्माजान्हवी' ही त्यांच्या कविता संग्रहांची काही नावे. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललित- लेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले. मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश सारखी भक्ती गीते लिहिली. शूर आम्ही सरदार आणि मराठी पाऊल पडते पुढे या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. वास्तविक शांता शेळके म्हणजे सगळ्या लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी किलबिल किलबिल पक्षी बोलती, विहीणबाई विहीणबाई अशा अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणाऱ्या. शांताबाई शेळके यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डावर काम केले. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. संतांचे अभंग आणि ओव्या तसेच पारंपरिक स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संस्कार त्यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात. गीतांचे लावण्या, कोळीगीते असे विविध प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत.

खरं म्हणजे त्यांच्याबद्दल एकाच वाक्यात म्हणता येईल की, त्या प्राजक्तासारख्या फुलांना आयुष्यभर उधळीत राहिल्या. आज त्या आपल्यात नाहीत; पण त्यांची ही कविता म्हणजे त्यांच्या आयुष्यातली भैरवीच आहे. त्या म्हणतात

असेन मी नसेन मी
तरी असेल गीत हे
फुलांफुलांत येथल्या
उद्या हसेल गीत हे

असं तृणात लवलवणारं, अश्रूतून ओघळणारं, फुलात हसणारं त्यांचं हे गीत भावभावनांची विविधता व्यक्त करतं. खरं म्हणजे शांता शेळकेंच्या अंतर्मनात दडून बसलेलं स्त्रीत्व असं स्वाभाविकपणे आणि सूक्ष्मपणे अनेक कवितांतून शब्दांशब्दांतून प्रकट होतं. झाले. त्यांना त्रिवार वंदन!

- पद्माकर कुलकर्णी, सोलापूर.

निवडणूक आयोग म्हणजे न्यायालय नव्हे

जबाबदारीने वागायची संधी त्यांना मिळालेली आहे. शिवसेना या राजकीय पक्षात उभी फूट पाडून ज्या कोणाला समाधान झाले असेल, त्यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत. आपला आनंद त्यांनी उपभोगावा. तो गुपचूपपणे, घरातल्या घरात, बंद दाराच्या आड साजरा करावा. कारण खुलेपणाने करण्याची त्यांची हिंमत नाही. त्यांची ती वृत्ती नाही. असे धाडस करण्याची त्यांना अनुमतीही नसणार आहे. कारण या पाडण्यामागील जो कोणी तथाकथित सूत्रधार असेल, संचालक असेल, चालक असेल, तो एका धोरणाने आणि विचाराने बांधला गेलेला आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर या धोरणाचा तो गुलामच आहे. या तालावर जे नाचत आहेत, ते बेधुंद आहेत. असो हा एक स्वतंत्र विषय विस्ताराने कधीतरी घेता येईल. मुख्य विषय निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा आहे.

खरी शिवसेना कोणाची? धनुष्यबाण हे निवडणुकीचे चिन्ह कोणाचे? यासाठीचे दावे प्रतिदावे आता निवडणूक आयोगाच्या कार्यालयात येऊन धडकलेले आहेत. खरे तर हा प्रश्न नाहीच. अक्कडबाजपणे उभा केलेली हा वाद आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला याबाबत आदेश देण्याच्या, निर्णय घेण्याच्या सूचना केलेल्या आहेत. यातील संबंधित व्यक्ती ही कायद्याने दिलेली शक्ती आणि अधिकार यासंदर्भात जबाबदार म्हणून संबोधली जाते. हे अधिकारी आपली कर्तव्ये पार पाडतील, असे सध्या तरी समजावयास हरकत नाही. खरे तर ही हमरी तुमची लढाई आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यक्षेत्रात तर हा विषय येऊ नयेच नये.

निवडणूक आयोग या संपूर्ण स्थितीत नेमका कसा वागतो, कशा पद्धतीने या परिस्थितीच्या हाताळणी करतो आणि निर्णय देतो हे पहावेच लागेल. हे पाहणे एव्हढेच सध्या तरी सुशिक्षित आणि कायद्यापेक्षा लोकशाहीची बूज राखणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या हाती, मतदारांच्या आहे. राजकीय पक्ष आला की- मतदार आले. मतदार कोणाला पाहून मतदान करतो यालाही काही पार्श्वभूमी आहे. त्याचाही काही एक इतिहास आहे. यालाही काही एक विचारांचा पाया आहे. निवडणूक आयोगाने याही बाबी विचारात घ्यायला हव्या आहेत. न्यायालय आपले निवाडे समोर सादर करण्यात आलेले दावे-प्रतिदावे, कागदपत्रे, साक्षी-पुरावे, युक्तिवाद प्रति युक्तिवाद या आधारे करीत असतो. हे निवाडे करीत असताना आपली सदसद्विवेकबुद्धी जागृत आहे, ती कार्यरत आहे, ती सक्रिय आहे, याचे भान संबंधित न्यायाधीशाला ठेवावे लागते. न्यायालयात भावना काम करत नाहीत. भावनेला न्यायालयात किंमत शून्य असते.

म्हणूनच तर न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी बांधलेली आहे. आपला-तुपला, स्वार्थ-परमार्थ या साऱ्याच्या पलीकडे जाऊन न्यायदेवतेला काम करावे लागते. तो कधीतरी मांडता येईल. आज महत्त्वाचा विषय आहे, तो निवडणूक आयोग शिवसेना कोणाची या निमित्ताने जो निर्णय देणार आहे, त्यासाठीची कागदपत्रे तपासणार आहे ,त्याबाबत जे दावे-प्रतिदावे यांचा तपास करणार आहे, अभ्यास करणार आहे आणि या तपासणीतून निष्कर्ष काढून, आपले जे मत देणार आहे त्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे, संपूर्ण देशाचेच नव्हे, तर या देशातील लोकशाहीतील निवडणुकीच्या प्रक्रिये संदर्भात चिंतन करणाऱ्या जगभरातील सर्व लोकांचे याकडे लक्ष आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणारे नाही.

शिवसेना कोणाची या निवडणूक आयोगासमोरील कार्यपद्धतीच्या संदर्भात आम्हास एवढेच सांगायचे आहे की, निवडणूक आयोग एका कायद्याअंतर्गत निर्माण झालेले सरकारी कार्यालय आहे. सरकारी व्यवस्था आहे. ते न्यायालय नाही. त्यामुळे न्यायाधीशाच्या खुर्चीत बसून जर निवडणूक आयोगाचे संबंधित अधिकारी, निर्णय देणार असतील तर तो निषेधार्थ असेल हे आम्ही आजच जाहीर करू इच्छितो. शिवसेनेची स्थापना, त्यांचे सामाजिक काम, त्यांची राजकीय वाटचाल आणि त्यांच्या पाठीमागे उभा असणारा मतदार याच्या विचाराची-मतांची निवडणूक आयोग बुज राखेल, अशी भावना आम्ही व्यक्त करीत आहोत.

सरकारी कार्यालय आणि सरकारी अधिकारी म्हटले की, ते विकत घेता येऊ शकतात, त्यांच्याकडून हवा तसा निर्णय घेता येऊ शकतो, हे सत्ताधारी राजकीय पक्षांचे नेहमीचेच विचार आहेत. त्यासाठी ते कार्यरत असतात ते काही स्वतंत्रपणे सांगावयाची आवश्यकता नाही. (मी मुख्यमंत्री म्हणून विचार केला असता तर शिवाजी पार्क शिवसेनेला मिळाले नसते. हे स्वगत जाहीर करणारे एकनाथ कदाचित एखादेच असतात. असे म्हणावे लागेल. याबद्दल त्यांना नाराजीचा सामना करावा लागला असेल. संबंधिताचे काही बोल ऐकून घ्यावे असतील अर्थात हे सारेच गुपित असते. त्याबाबत भाष्य करावयाचे नसते.)

तत्कालीन सर्व शक्तिमान सत्ताधारी इंदिरा गांधीच्या विरोधात निर्णय देणाऱ्या न्यायमूर्ती जगमोहनलाल सिन्हा सारखा जसा एखादाच न्यायाधीश अनंत काळपर्यंत जनतेच्या मनात घर करून राहतो, तसाच निवडणूक प्रक्रियेमध्ये, निवडणूक कार्यालयात काम करणारे टी.एन. शेषन यांच्या सारखे अधिकारी सामान्य जनतेच्या मनात अनंत काळपर्यंत घर करून रहात असतात. हे सध्याच्या निवडणूक आयोगात कार्यरत असणाऱ्या अधिकारी लोकांनी विसरू नये. एवढेच काय ते सांगणे आहे. एवढीच काय ती माफक अपेक्षा आहे. एका विशिष्ट जबाबदारीने वागण्याची संधी आज निवडणूक आयोगाला मिळालेली आहे. या संधीचे ते सोने करतात का माती हे येणाऱ्या नजीकच्या भविष्यकाळात समजेलच.

खरी शिवसेना कोणाची, यामध्ये खरी भूमिका मतदाराची असते. लोकप्रतिनिधी म्हणजे मतदार, आमदार खासदार म्हणजे राजकीय पक्ष, अशा भूमिकेतून जर कोणी वागत असेल तर तो लोकशाहीतील विचार नाही. ही लोकशाहीची जनमताची थट्टा असेल. हा उद्दामपणा आहे. कारण राजकीय पक्षांकडून निवडणुकीतील उमेदवार हा नेहमी लादला जात असतो. मतदार लोकशाहीच्या प्रेमापोटी आपले मत टाकत असतो. व्यक्ती पेक्षा राजकीय पक्ष आणि पक्षप्रमुख यांचेकडे बघण्याची मतदारांची भूमिका अधिक असते. तसे नसते तर सोलापुरातून शरद बनसोडे आणि जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी हे खासदार म्हणून कधीच निवडून आले नसते. अर्थात हे भाजप संबंधातील दिलेले एक उदाहरण आहे. कारण न्यायदेवतेच्या डोळ्यावर असलेल्या पट्टीपेक्षा, अधिक घट्टपणे डोळ्यावर पट्टी बांधून आम्ही हे मतदान केलेले होते. सर्वच राजकीय पक्षांचे बाबतीमध्ये हा नियम लागू आहे. हाच नियम शिवसेनेच्या तिकिटावरून निवडून आलेल्या सगळ्याच आमदार, खासदार आणि लोकप्रतिनिधी लागू आहे हे विसरता येणार नाही. म्हणूनच निवडून आलेले आमदार-खासदार म्हणजे राजकीय पक्ष अशा भूमिकेतून जर निवडणूक आयोग निकाल देणार असेल, देत असेल तर तो लोकशाहीचा खून असेच म्हणावे लागेल.

- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.

जनमानस

उच्च तंत्रशिक्षण हिंदी अथवा स्थानिक भाषेत हवे

संसदीय समितीने उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये हिंदी किंवा स्थानिक भाषेतून शिक्षण दिले जावे, अशी महत्वपूर्ण शिफारस केली आहे.

यामध्ये जी हिंदी भाषिक राज्ये असतील तेथे हिंदी भाषेत तर जेथे इतर भाषिक राज्ये असतील तेथे तेथील भाषेमध्ये शिक्षण दिले जावे, अशी महत्व पूर्ण शिफारस केली आहे. आयआयटीसारख्या तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये याची अंमलबजावणी व्हावी, असे सुचविले आहे.

एकूण सर्वच राज्यामध्ये इंग्रजी ऐवजी स्थानिक भाषेत अधिक प्राधान्य दिले पाहिजे अशीही शिफारस या संसदीय समितीने केली आहे. याशिवाय संयुक्त राष्ट्रांमध्ये हिंदी ही अधिकृत भाषा व्हावी, अशी मागणी केली आहे.जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र हे भारत आहे. जगातील ७ व्यक्तींमागे एक व्यक्ती भारतीय आहे तथापि युनोमध्ये हिंदी या भारताच्या भाषेला अधिकृत भाषा म्हणून स्थान मिळालेले नाही. तिच परिस्थिती सुरक्षा समितीची सुध्दा आहे. या समितीत कायम राष्ट्रांच्या यादीत भारताचा समावेश गेल्या सत्तर वर्षात अजूनही नाही. या दोन्ही गोष्टीवर भारताला प्रतिनिधित्व देणे ही आंतरराष्ट्रीय जरुरी आहे. उच्च शिक्षण देण्यासाठी हिंदी किंवा स्थानिक भाषा आवश्यक आहे, हे संसदीय समितीने सुचविले आहे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. आता या पुढील जबाबदारी सरकारची आहे.

- शांताराम वाघ, पुणे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

राष्ट्रीय कन्या दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे सत्राचे आयोजन

सोलापूर : कन्या ही कुटुंबातील चैतन्य, आनंद असून प्रसंगी आधारही असते. त्यामुळे कन्या जन्माचा उत्सव साजरा करणे आणि स्वागत करणे क्रमप्राप्त ठरते असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नरेंद्र जोशी यांनी केले. विधी सेवा प्राधिकरण तर्फे राष्ट्रीय कन्या दिनाचे औचित्य साधत मंगळवारी सिध्देश्वर तंत्रनिकेतन (मुलींचे) महाविद्यालय येथे संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. स्त्री ही आज प्रत्येक क्षेत्रात सक्षम रितीने आपले कतृत्व गाजवत असून त्या- त्या क्षेत्रावर आपला ठसा उमटवलेला आहे. त्यामुळे एक सदृढ समाज व्यवस्था निर्माण होण्यास हातभार लागत आहे असेही ते म्हणाले. या मार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. श्वेता कल्लुरकर (प्रा.वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालय), शिवाजी राऊत (पोलिस निरीक्षक) आणि श्रीमती भोसले (महिला व बाल विकास) मल्लिनाथ शहाबादे (अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. कल्लुरकर यांनी मुलींशी संवाद साधत वैद्यकीय सेवा याबाबत माहिती दिली. तसेच मुलींनी घ्यावायाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच शिवाजी राऊत यांनी तपास यंत्रणेची प्रक्रिया गुन्हयाच्या अनुषंगाने विशद केली. श्रीमती भोसले यांनी महिला व बालविकास कार्यालयातर्फे राबविण्यात येणाल्या शासकीय योजनांची माहिती दिली. या कार्याक्रमाचे सुत्रसंचलन विधी सेवा प्राधिकरणाचे पॅनल विधीज्ञ सरोज तमशेट्टी यांनी केले. या संवाद सत्रात माहाविद्यालयातील मुलींनी तपास यंत्रणा, वैद्यकीय कार्यपध्दती आणि न्यायप्रक्रिया यावर प्रश्न उपस्थित केले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्रा.गजानन धरणे, आर. एस. पाटील आदींचे सहकार्य लाभले.

वसुंधरा महाविद्यालयास नॅककडून 'ए' मानांकन प्राप्त

सोलापूर : येथील वसुंधरा कला महाविद्यालयास नॅशनल असेसमेंट आणि अँक्रिडिटेशन कौन्सिल, बेंगलोर या संस्थेकडून सेकंड सायकल मुल्यांकनासाठी महाविद्यालयास 'ए' चे मानांकन देण्यात आले आहे. महाविद्यालयाचे मूल्यमापन करण्यासाठी दि. २८ व २९ सप्टें. रोजी पिअर टीमने महाविद्यालयास भेट दिली. या टीममध्ये उत्तराखंड येथील माजी कुलगुरू डॉ. डी. एस. नेगी (अध्यक्ष) तर समन्वयक म्हणून उत्तर प्रदेश येथील डॉ. मुक्तेश कुमार सिंग तर सदस्य म्हणून केरळ येथील डॉ. मँथ्यु जोसेफ यांचा समावेश होता. त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेटी दिल्या, जिमखाना, ग्रंथालय, इतिहास वस्तुसंग्रहालय, कम्प्युटर लॅब, गांडूळ खत प्रकल्प, रेन वॉटर हार्वेस्टिंग, आजी-माजी विद्यार्थी सभा, पालक सभा, महिला वसतीगृह, मैदान इत्यादी सोयी सुविधांची पाहणी केली. महाविद्यालयात चालणारे उपक्रम, संशोधन, ऑनलाइन टीचिंग लर्निंग प्रोसेस, वस्तूसंग्रहालय, प्रयोगशाळा याचे टीमने कौतुक केले. या सर्व निकषाच्या आधारे महाविद्यालयास 'ए' गुणांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाच्या या यशामध्ये कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, अध्यक्ष अब्राहम आवळे, उपाध्यक्ष अभिजीत ढोबळे, सचिव सिद्राम जावीर, ट्रस्टी विजयकुमार पोटफोडे, क्रांतीताई आवळे, कोमलताई साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच वेळोवेळी मार्गदर्शन करणारे प्राचार्य बी. एम. भांजे, प्राचार्य जी.एन. चिट्टे, प्रा. डॉ. संतोष राजगुरू, प्रा. डॉ. दीपक ननवरे, प्रा. डॉ. सी.एस. मुलगे, डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांचेही सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या मूल्यांकनासाठी प्राचार्या डॉ. मीना गायकवाड, नॅकचे समन्वयक प्रा. प्रदीप कोल्हे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कोजागिरीनिमित्त रामवाढी येथील जगदंबा मंदिरातून छबीना मिरवणूक

सोलापूर : कोजागिरी पौर्णिमेनिमित्त जगदंबा मंदिरातून छबीना मिरवणूक मिरवणूक निघाली. छबीनाची पूजा माजी नगरसेवक नागेश गायकवाड आणि सलगर वस्ती पोलिस स्टेशनचे पीएसआय वाबळे यांच्या हस्ते झाल्याचे यावेळी मंदिराचे पूजारी रामकृष्ण गायकवाड यांनी सांगितले. भर पावसात छबीना सोहळ्यास नागरिक उपस्थित होते. छबीना मिरवूकीवेळी प्रत्येक चौकात अल्पोपाहाराची व्यवस्था माजी नगरसेवक गायकवाड यांनी केली होती. याप्रसंगी अध्यक्ष नागेश जाधव, उपाध्यक्ष गोपाळ दोडमनी, दयानंद जाधव, मदन गायकवाड, निलेश गायकवाड आदी उपस्थित होते.

पंढरपूर पुरवठा विभागातील गैरकारभाराची जिल्हापुरवठा विभाग स्वतंत्र चौकशी करणार

▪ पैसे दिलेल्या दुकानदारांचे जबाब घेणार : वर्षा लांडगे

सुराज्य/सोलापूर

पंढरपूर पुरवठा विभागातील सावळा गोंधळप्रकरणी पुणे विभागाचे पुरवठा उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. याबरोबर जिल्हा पुरवठा विभागाने देखील दखल घेतली आहे. या पुरवठा विभागाची स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पथक पाठवून चौकशी करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे यांनी काढले आहेत. तर रेशन दुकानदार संघटनेच्या वतीने पुरवठा अधिकाऱ्यांची भेट घेऊन गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अनेक दिवसांपासून पंढरपूर पुरवठा विभागातील कारभार हा झिरो कर्मचाऱ्यांवर सुरू आहे. या बेकायदा कर्मचाऱ्यांकडून रेशन दुकानदार व शिधापत्रिकाधारकांना वेठीस धरले जात आहे. व्हीआयपींच्या नावाखाली होत असलेली वसुली व मंथली ही झिरो कर्मचाऱ्यांच्या फोन पे वरून करण्यात येत आहे. यासंदर्भातील वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर संबधितांचे धाबे दणाणले आहे. दरम्यान, रेशन दुकानदार संघटना आक्रमक झाली आहे. मंगळवारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची भेट घेऊन पंढरपूर पुरवठा विभागातील सावळ्या गोंधळाविरोधात जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर, नितीन पेंटर, बापू गदगे, वाहब शेख, उमेश असादे, मुझफर शेख, राज कमटम विजय सांळूखे, सचिन भिंगारे उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्वतंत्र चौकशी

या प्रकरणाची वृत्तपत्राकडून माहिती मिळाली. हे प्रकरण खुप गंभीर आहे. पंढरपुरातील पुरवठा विभागाची तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्याकडून पुरवठा विभागाकडून चौकशी केली जाईल, ज्या दुकानदारांकडून पैसे घेतले, त्यांचे जबाब घेऊन सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी आणि पुरवठा विभागाचे उपायुक्तांना सादर केला जाईल.

- वर्षा लांडगे (जिल्हापुरवठा अधिकारी)

वसुली करणारे हे तीन झिरो कर्मचारी

पंढरपूर तहसील कार्यालय अंतर्गत पुरवठा शाखेतील तिघेजण राजरोसपणे रेशन दुकानदारांकडून युनिटवाढ करण्यासाठी, डाटा फिडींग करण्यासाठी, ट्रकशिट सोडण्यासाठी तसेच पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे येणारे प्रत्येकाचे प्रोटोकॉल, शासकीय सभा, व्ही आय पी दौऱ्याच्या नावाखाली रक्कमेची मागणी करुन रक्कम सक्तीने फोन पे, गुगल पे द्वारे वसुली करत असल्याची तक्रार रेशन दुकानदार संघटनेने जिल्हापुरवठा अधिकारी यांच्याकडे केली आहे.

रेशन दुकानदारांवर दबाब

पुरवठा विभागाचे हप्ते वसुलीचा गोरखधंदा उघड झाल्यानंतर ज्या रेशन दुकानदरांकडून पैसे घेतले आहेत. त्या दुकानदारांवर पुरवठा कार्यालयाकडून दबाव आणला जात आहे. पैसे दिले नाहीत असे सांगण्यासाठी दबाव आणला जात आहे. काही दुकानदार सोलापुरात येऊन पुरवठा अधिकाऱ्यांची, संघटनेची भेट घेत आहे. त्यांच्यावर वेग - वेगळ्या प्रकारे दबावतंत्राचा वापर केला जात आहे, अशीही संघटनेची तक्रार आहे.

सोलापूरच्या 'सिल पॅक' लघुचित्रपटाची दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड

दिग्दर्शक : ॲड. रवी गजधाने व सृष्टी कसबे, निर्माता : सृष्टी कसबे, कथा, पटकथा व संवाद : ॲड. पवन भालेदार, संगीत दिग्दर्शक : राजेश उडाणशीव, सहा. संगीत दिग्दर्शक : स्वप्निल कोष्टी व मयुर अहिरराव, छायाचित्रण व संकलन : करण जाधव, ध्वनी संयोजन : निनाद स्टुडिओ, गीतकार व गायक : डॉ. औदुंबर मस्के आणि संकल्पना : डॉ. रामेश्वर डावकर.

सोलापूर : महाकारुणिक प्रॉडक्शन निर्मित 'सीलपॅक' लघुचित्रपटाची मुंबई येथे फेब्रुवारी २०२३ मध्ये होणाऱ्या दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल साठी निवड झाली आहे. महाकारुणिक प्रॉडक्शनचा हा दुसरा लघुचित्रपट आहे. यापुर्वीच्या 'किसा गोतमी' या लघुचित्रपटास विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

'सीलपॅक' हा सामाजिक विषयावरील लघुचित्रपट आहे. हा लघुचित्रपट फिमेल व्हर्जिनीटी टेस्ट अर्थात स्त्रीयांची कौमार्य चाचणी या अतिशय संवेदनशील व गंभीर विषयावरचा प्रबोधनात्मक लघुचित्रपट आहे. या लघुचित्रपटात त्रिशला चिडगुंपी, बुद्धभुषण काटे, करुणा उडाणशीव, तात्यासाहेब मोटे, शंकर बेलभंडारे, प्रभावती बेलभंडालरे, सविता मस्के, बापू मस्के, दयानंद शिंदे, शुभांगी शिंदे, हर्षदा शिंदे, युक्ता शिंदे, बाळासाहेब मोटे, ॲड. पवन भालेदार, डॉ. रामेश्वर डावकर व डॉ. औदुंबर मस्के यांनी मुख्य भुमिका केल्या आहेत. या लघुचित्रपटाच्या माध्यमातून आम्ही विशेषतः तरुण वर्गाला अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने लैंगिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे स्त्री कौमार्य चाचणीसारख्या अनिष्ट व माणुसकीला काळिमा फासणाऱ्या कुप्रथांना आळा घालण्यास मदत होईल. पर्यायाने गैरसमजातून वैवाहिक जीवन उद्धवस्त होण्याच्या घटनांना प्रतिबंध होईल, असा विश्वास चित्रपटाचे दिग्दर्शक ॲड. रवी गजधाने व सृष्टी कसबे यांनी व्यक्त केला.

विकासात्मक कामातून वेळापूरचा कायापालट करणार : जानकर

वेळापूर : वेळापूर शहराच्या विकासासाठी नेहमीच अग्रेसर राहून गावासाठी जे काय करता येईल ते करण्याचा मी सदैव प्रयत्नशील असतो, वेळापूर शहरातील व वाड्यावरस्त्यावरील जास्तीत जास्त कामे करण्याचा प्रयत्न केला असून जी काही कामे राहिले असतील लोकांची मागणी असेल ती कामे वेळेत पूर्ण केली जातील असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा माळशिरस पंचायत समितीचे माजी सभापती उत्तमराव जानकर यांनी केले.

ते वेळापुर ग्रामपंचायतीच्या वेळापुर भाईनाथ नगर येथील सिमेंटरस्ता बंदिस्त गटार पाईपलाईनच्या १४ लाख रुपयांच्या कामाचा शुभारंभ प्रसंगी बोलत होते. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, यांच्या हस्ते श्रीफळ फोडून फावडे मारुन कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपसरपंच जावेद मुलाणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दादासाहेब यादगे, ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, संदिपतात्या माने देशमुख, वाहन मालक-चालक प्रतिनिधी महासंघ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संजय देशपांडे, निवृत्ती भुसारे, मधुकर कदम लखन मंडले, जवान माने देशमुख, हणमंत वायदंडे, नागेश क्षिरसागर, गणेश साठे, अमोल पनासे, विनायक माने, नितीन साठे, महेश देवकते, अभिजीत साठे व भाईनाथ नगर मधील नागरिक उपस्थित होते.

जुना विडी घरकूल पसिरातील राघवेंद्र नगरात चोरी

सुराज्य/सोलापूर

जुना विडी घरकूल पसिरातील राघवेंद्र नगरात राहणाऱ्या महिलेच्या घरातील सहा हजार रुपयांची रोकड व १८ हजारांचे मंगळसूत्र चोरट्याने चोरून नेले आहे. या प्रकरणी मधुकर अंबाजी चिनकेरी यांनी एमआयडीसी पोलिसांत फिर्याद दिली आहे. घराच्या मुख्य दरवाजातून प्रवेश करून किचन कट्ट्यावरील मंगळसूत्र व फ्रिजवरील रोकड चोरट्याने पळवून नेली आहे. ७ ते ८ ऑक्टोबर दरम्यान ही चोरी झाल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले. पोलिस हवालदार पाटील तपास करीत आहेत.

ताडसौंदने रोडवर ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

बार्शी : बार्शी शहरानजीक असलेल्या कुर्डूवाडी लातूर बायपास वरून जामगावकडे निघालेल्या ट्रकच्या मागील बाजूस बार्शी कडे निघालेल्या दुचाकींची जबर धडक होऊन त्यात रामचंद्र फकिरा बचुटे वय ४५ (रा.गुलपोली) हा रोडवर पडून रक्तबंबाळ होऊन त्याच्या डोकिस मार लागून जागीच मयत झाल्याची घटना घडली.ही घटना रविवारी बायपास रोडवरील बीआयटी कॉलेज जवळच्या चौकात होऊन याबाबत मयताचा जावइ सागर तानाजी बारबोले (३१ रा.दारफळ ता.माढा) यांनी शहर पोलीसात खबर दिली.

अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. यात मयत झालेला रामचंद्र बचुटे हा ताडसौदणे येथील विकास पाटील यांच्या शेताच्या द्राक्षबागेत काम करीत असून तो रविवारी सकाळी साडेनऊच्या दरम्यान ताडसौदणे येथून त्याच्या शेतातील पिकावर औषध फवारणी करण्यासाठी ताडसौंदने येथून एम.एच.१३ सीए.५९४४ या दुचाकीवरून गुळपोलीकडे निघाले होते बीआयटी कॉलेजवळील चौकातुन रोड क्रॉस करत असताना कुर्डूवाडीकडून लातूरच्या दिशेने एम.एच. २५ यु. ५७७९ ही ट्रॅक जाताना त्याच्या डाव्या बाजूच्या मागील टायर जवळ दुचाकींची जबर जोरदार धडक बसली. त्या धडकेमध्ये मयत रोडवर पडून डोक्यास मार लागून रक्तबंबाळ होऊन गंभीर इजा झाल्याने त्याचा जागीच मृत्य झाल्याचे दिसून आले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी १०८ नंबरला फोन करताच आगळगाव व बार्शी येथील १०८ नंबरच्या ऍम्ब्युलन्स तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. परंतु सदरील इसम हा मयत झाल्याचे दिसून आले. शहर पोलिसाना हा अपघात समजताच पो.नाईक दत्तात्रय अडसूळ, पो.कॉ. वैभव माने, पोलीस पवार पो.कॉ.चौधरी, पोलीस पांढरे यांनी येऊन पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी पाठविले.

महापालिका, नगरपरिषदांच्या नगरसेवकांप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांनाही निधी द्या : प्रफुल्ल कदम

सुराज्य/सोलापूर

राज्यातील महापालिका नगरपरिषदे तील नगरसेवकाप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांना विकास कामासाठी निधी उपलब्ध करून द्या, या मागणीसाठी दि. १७ नोव्हेंबर रोजी सांगोला येथे मेळाव्याचे आयोजन केले असून त्या ठिकाणाहून सर्वात मोठी फोन चळवळ सुरू करण्यात येणार आहे. या फोनच्याद्वारे मंत्रालयातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिवसभर फोन लावून मागण्यांचे निवेदन करण्यात येणार आहे.

फोनवरून मागण्या ही चळवळ संपूर्ण राज्यभर सुरू करण्यात येणार आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत. तोपर्यंत संपूर्ण राज्यातून आमचे ही चळवळ सुरू राहणार असल्याची माहिती चळवळीचे प्रफुल्ल कदम यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

दि. १७ नोव्हेंबर पासून मागण्या मान्य होईपर्यंत व राज्यभरातून लोक दररोज सतत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कार्यालयात फोन करणार आहेत. केंद्र शासन व देशातील सर्व राज्य शासनांना प्रफुल कदम यांनी राष्ट्रीय क्रांतीचा नवा प्रस्ताव सादर केला आहे. त्याप्रमाणे दि. १७ नोव्हेंबर पासून त्याची चळवळ उभी करण्यात येणार आहे. आमदार, खासदार प्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नगरपालिका व महापालिका नगरसेव यांना त्यांच्या प्रत्येक वर्गासाठी दरवर्षी अनुक्रमे दहा लाख २५ लाख आणि ५० लाख रुपये प्रमाणे स्वतंत्र विकास निधी देण्यात येतो त्याप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य त्यांच्या वार्डात विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी या चळवळीच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. या मागणी सह इतर सहा मागण्या आहेत. आम्ही त्या राज्य शासनाकडे मागणार आहोत. निवडणुकीत पराभूत झालेल्या दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवारालाही ५० टक्के स्वतंत्र निधी द्या गाव किंवा शहर विकासाचे युनिट न मानता वार्ड हे विकासाची नवीन चळवळ असणार आहे. या चळवळीमध्ये राज्य शासनाकडे निवेदन देण्यात येणार आहे.

शिक्षक व पदवीधर मतदारसंघाप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांचा व नगरसेवकांचा स्वतंत्र मतदारसंघ तयार करून राजेभरातून व देशभरात कायदेमंडळात प्रतिनिधित्व निवडण्यात यावेत. नियोजन व आराखडा बनवण्यासाठी या राष्ट्रीय चळवळीचे या संकल्पनेतून प्रफुल्ल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली शासनाकडे रोज या संदर्भात मागणी करण्यात येणार आहेत.

AN AUTONOMOUS INSTITUTION (DTE CODE : 6265)
S.A.P.D.Jain Pathashala Trust, Solapur (Estd.: 1885)
WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY Estd.: 1983

Ashok Chowk, Solapur- 413 006, (Maharashtra) | Phone No.: (0217) 2652700, 2653040
▪ admissions@witsolapur.org ▪ www.witsolapur.org

NAAC Accredited with A+ Grade by National Assessment and Accreditation Council, Bangalore
NBA All UG Programs Accredited by National Board of Accreditaion, New Delhi

B. Tech. ADMISSIONS
51% Seats are Reserved for Jain Minority Students

WINNER OF TOYCATHON 2022 — Grand Finale organized by Ministry of Education, Ministry of Information and Broadcasting, Ministry of MSME, Ministry of Women and Child Development, Ministry of Commerce and Industry, Ministry of Textile, AICTEMoE's Innovation Cell (Government of India)
aws educate Member Institution — Students Recipient of Google Udacity Scholarships
Thrice Winner of Infosys — Awarded as Best Institute for Industry Elective Rollout.
ARIIA — "WIT as PERFORMER" under the category Institutes in (ARIIA) 2021, by The Ministry of Education, Government of India

Placement in MNC's is our Top Priority
Companies Visiting for Placements: 70+
Highest Salary Package: 35.8 LPA
85%+ Placements in the Consecutive Years
Total Placement Offers: 750+

Naitik Doshi — amazon — Annual Package in Lac 35.8
Arihant Abbad — JAVIS — Annual Package in Lac 30.6
Pratik Jain — PARK+ — Annual Package in Lac 19
Shreyansh Sancheti — Colortokens llp — Annual Package in Lac 17.5
Sonali Nogja — Peritus.ai — Annual Package in Lac 11
Pratik Badole — BYJU'S — Annual Package in Lac 10

B.Tech. Programmes

Branch	Seats	Branch	Seats
▪ Civil Engineering	60	▪ Computer Science and Engineering	180
▪ Electronics and Computer Engineering	60	▪ Electronics and Telecommunication Engineering	120
▪ Mechanical and Automation Engineering	60	▪ Information Technology	120

Counselling & Admission : 7588 57 11 00 | 7588 58 11 00

निधन वार्ता

घनश्याम कांबळे

सुराज्य/मोहोळ : कोरवली येथील महावितरणचे निवृत्त कर्मचारी घनश्याम पांडुरंग कांबळे यांचे अपल्शा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ६३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, चार मुली, दोन मुले व नातवंडे असा मोठा परिवार आहे. कोरवली येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

शौकत बागवान (बावीकर)

सुराज्य/अकलूज : अकलूज येथील फ्रुट विक्रेते शौकत गुलाब बागवान (बावीकर) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने पुणे येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना. नातवंडे असा परिवार आहे. अकलूज येथील दफन भूमीमध्ये त्यांचा दफनविधी करण्यात आला.

अजय राऊत

सुराज्य/माळशिरस : पुरंदावडे (ता. माळशिरस) येथील अजय ऊर्फ नानासो यशवंत राऊत यांचे वयाच्या ४१ वर्षी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आजी, आई, वडील, पत्नी, दोन मुले, एक भाऊ, भावजय व तीन चुलते असा परिवार आहे. त्यांच्यावर पुरंदावडे गावठाण मेडद रोड येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्काराप्रसंगी माळशिरस पंचायत समिती मधील अधिकारी, कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामसेविका, महा-ई-सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

पेंट्टमा दुर्गम

सुराज्य/सोलापूर : हैदराबाद रोडवरील विडी घरकुल येथील पेंटम्मा सिद्राम दुर्गम (वय ६८) यांचे शुक्रवारी रात्री (ता. ७) आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील शांतीधाम पद्मशाली स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी सात रस्ता शाखेतील सहायक व्यवस्थापक दयानंद सिद्राम दुर्गम यांच्या त्या मातोश्री होत.

शशिकला जोशी

सुराज्य/सोलापूरः शशिकला राजाराम जोशी (नाशिक) यांचे सोमवारी रात्री ९ वा. वार्धक्याने सोलापुरात निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, २ मुली, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. तरुण भारतचे कार्य. संचालक दिलीप पेठे यांच्या सासूबाई तर इंडस्ट्रियल इस्टेटच्या उपाध्यक्षा सुवर्णा पेठे यांच्या त्या मातोश्री होत.

हिराबाई काळे

सुराज्य/सोलापूर : येथील हिराबाई मच्छिंद्र काळे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुली, दोन मुले, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा हे जनपूर येथून १२ रोजी स. ११ वा. त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. जनपूर तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सॅमसन काळे यांच्या त्या मातोश्री होत.

गाजर, वांगी, कोबी महागले

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मंगळवार, ११ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली. यामध्ये वांगी, कोबी, ढोवळी मिरची, गाजर, कोथिंबीर, हिरवी मिरची, कांदा पात, लिंबू, मेथी भाजी, कांदा आदींच्या किंमती प्रतिक्विंटल २०० ते हजार रूपयेने महागल्या. तर काकडी, फ्लॉवर, चाकवत, तांदूळ, शेपू, पालक, टोमॅटो आदींच्या किंमती आज स्थिर राहिल्या.

सोलापूर बाजारभाव

शेतमाल	कमीत कमी दर (क्विं.)	जास्तीत जास्त दर (क्विं.)	सर्वसाधारण दर
सफरचंद	३,५००	६,०००	५,०००
कारली	२,०००	३,८००	३,०००
वांगी	२,०००	३,०००	५,०००
कोबी	७००	१,४००	१,०००
ढोवळी मिरची	७००	२,५००	१,५००
गाजर	१,५००	२,२००	२,०००
गवार	३,०००	६,०००	४,०००
कोथिंबीर	१,०००	२,५००	१,५००
काकडी	१,५००	६,५००	३,०००
फ्लॉवर	९६०	१,७६०	१,१२०
लसूण	९००	२,६००	१,५००
घेवडा	५,०००	५,०००	५,०००
हिरवी मिरची	२,५००	४,०००	३,०००
अंबाडी भाजी	२००	५००	३००
कांदा पात	१,०००	१,०००	१,०००
बटाटा	७५०	२,१००	१,८००
राजगिरा	७००	८००	७००
लिंबू	२,०००	५,२००	४,०००
तांदूळ	२,९८५	६,३००	३,७७०
दोडका	१,०००	५,०००	३,०००
शेपू	६००	१,२००	१,०००
पालक	६००	१,०००	७००
टोमॅटो	२००	२,२००	८००
गहू	२,२९५	३,२३०	२,७३५

दिव्यांगांच्या कल्याणासाठी केलेल्या १३ ठरावांची अंमलबजावणी करावी

लालबावटा दिव्यांग श्रमिक संघटनेचे महापालिका आयुक्तांना निवेदन!

सुराज्य/सोलापूर

महापालिका सभेत दिव्यांगांच्या कल्याणासाठी केलेल्या एकूण १३ ठरावांची अंमलबजावणी करावी यासह विविध मागण्यांचे निवेदन लालबावटा दिव्यांग श्रमिक संघटनेच्यावतीने महापालिका आयुक्तांना देण्यात आले.

सोलापुरातील हजारो दिव्यांग बांधवांचे अनेक प्रश्न महानगरपालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, शासनाचा आदेश असतानाही दिव्यांग लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळत नाही, असा आरोप केला आहे. मागण्या १५ दिवसांच्या आत मान्य झाल्या नाही तर माजी आ. नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली लालबावटा दिव्यांग श्रमिक संघटनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. महानगरपालिका सभागृहात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण १३ ठरावांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सोलापूर महानगरपालिकेच्या मिळकतीमधून ५ टक्के निधी दिव्यांग जनांच्या कल्याणासाठी खर्च करावा अशी तरतूद असताना, तो पूर्णपणे खर्च केला जात नाही. २०१८ पासून आजतागायत तफावत असलेल्या रकमेचा दिव्यांग कल्याणासाठी वापर करण्यात यावा, ४० टक्के ते १०० टक्के दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना २०१६ चा समान कायदा लागू करून दरमहा सरसकट २ हजार रुपये उदरनिर्वाह भत्ता लागू करावा, दिव्यांग सक्षमीकरण योजनेअंतर्गत २०१९ पासून आजतागायत व्यवसायाकरिता अर्थसहाय्य अनुदान मागणी अर्ज केलेल्या सर्व लाभार्थ्यांना मागणीप्रमाणे त्वरित अर्थसहाय्य मिळावे, दिव्यांगांसाठी आरक्षित असलेल्या ५ टक्के निधीचा दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात आला नाही, या शिल्लक असलेल्या निधीतून दिव्यांग लाभार्थ्यांना ५ हजार रुपये बोनस द्यावा, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

यावेळी अध्यक्ष बाबूलाल फनिबंद, सचिव इलियास सिद्दीकी, उपाध्यक्ष आसिफ पठाण, कोषाध्यक्ष अकिल शेख, संदीप गायकवाड, धनसिंग लंबूवाले, नंदू क्षीरसागर, राजेश्याम उय्याला, दस्तगीर शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

गळफास घेऊन आत्महत्या केल्याने बार्शीत खळबळ

सुराज्य/बार्शी

बार्शी शहरातील यशवंतनगर येथील राहत्या घराच्या पत्र्याच्या शेडच्या अँगलला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

ही घटना ८ रोजी रात्री उशिरा घडली असून याबाबत नेहा मोहन गायकवाड, वय वर्षे ४० रा. तुळजापूर नाका यशवंत नगर बार्शी हिने पोलीसात खबर दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, या ठिकाणी मयत व फिर्यादी दोघेच रहात असून मयत हा श्रीरामपूर जिल्हा नगर येथील असून तो एक वर्षांपासून फिर्यादीच्या घरी रहात आहे. घरात दोघेच असून या दिवशी फिर्यादी जोगवा मागण्यासाठी गेली होती. त्यावेळी तो घरात झोपला होता. ि

फर्यादी दुसऱ्या दिवशी ९ रोजी सकाळी घरी आल्यानंतर दरवाजा आतून बंद असल्याने तिने हाका मारल्या पण आतून बंद असल्याने तिने तिचा सहकारी दत्ता खंडागळे यास बोलावून हाका मारूनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे खिडकी उघडून पाहताच त्याने दोरीने गळफास घेतलेला दिसला. त्यामुळे तिने पोलिसात खबर दिली. त्याचा पुढील तपास पो. हे. कॉ. घोडके हे करीत आहेत.

तोटा सहन करून विठ्ठलच्या सभासदांची दिवाळी गोड

प्रत्येक सभासदांसाठी ६० किलो साखर : अभिजित पाटील

सुराज्य/पंढरपूर

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना दिवाळीसाठी ६० किलो साखर चेअरमन अभिजित पाटील यांनी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून बंद असलेली साखर कारखाना बंद असून सुद्धा अभिजित पाटील यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखाना गेल्या हंगामात बंद होता त्यामुळे शेतकऱ्यांना दिवाळीसाठी साखर उपलब्ध असून सुद्धा तत्कालीन संचालक मंडळाने शेतकऱ्यांना दिवाळीसाठी दिली नव्हती.

चेअरमन अभिजित पाटील दिवाळीसाठी ८ हजार क्विंटल साखर २ कोटी ६८ लाख रुपयांना विकत घेऊन सभासदांना २५ रुपये प्रति किलो दराने ६० किलो साखर दिवाळीसाठी देण्यात येत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना साखरेचे कुपन वाटप करण्यात येत आहेत

अभिजित पाटील यांनी चेअरमन झाल्यानंतर मागील संचालक मंडळाची थकलेली एफआरपी तसेच ऊस तोडणी वाहतूकदारांची देणे कामगाराच्या पगारी केल्या आहेत. विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर कोट्यवधी रुपयांचे कर्ज असल्यामुळे राज्य बँकेने कर्ज दिले नाही. त्यामुळे आपल्या खाजगी साखर कारखान्यावर कर्ज काढून शेतकऱ्यांची दोन वर्षे थकलेली देणी दिली आहेत. त्यामुळे अभिजित पाटील यांच्या बद्दल शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

गेल्या हंगामात कारखाना बंद असून देखील सभासदांची दिवाळी गोड करण्यासाठी ६८ लाख रुपयांचा तोटा सहन करून अभिजित पाटील यांनी शेतकऱ्यांची दिवाळी गोड केली आहे. दिवाळीसाठी विठ्ठल सहकारी साखर कारखाना, हॉटेल विठ्ठल कामत, तसेच गट कार्यालयात साखर उद्यापासून देण्यात येणार आहे.

मशाल पेटवून युवासेनेचा जल्लोष

सुराज्य/अकलूज

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव आणि मशाल हे चिन्ह निवडणूक आयोगाने दिल्यामुळे युवासेना सोलापूर जिल्ह्याच्यावतीने संगम येथे युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली मशाल पेटवून पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.

यावेळी हनुमंत गायकवाड,बबलू इंगळे, नवनाथ इंगळे, विकास भोई, अक्षय पराडे, नितीन इंगळे, अविनाश भोई, सचिन इंगळे, शहाजी इंगळे, केशव पराडे, नागेश इंगळे, साहिल हुंबे, शुभम भोई, राहुल भोई, प्रतीक इंगळे इ. युवा सैनिक उपस्थित होते.

पंढरपूरला १८ ऑक्टोबरला रोजगार मेळावा

सुराज्य/पंढरपूर

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग आणि रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय व गुरुप्रसाद कॉम्प्युटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार १८ रोजी रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त सचिन जाधव यांनी दिली

रोजगार मेळाव्यासाठी औद्योगिक परिसरातील नामांकित उद्योजकांनी सहभाग दर्शविलेला असून त्यांच्याकडून विविध प्रकारची रिक्तपदे कळविण्यात आलेली आहेत. ही सर्व रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, बीए, बी. कॉम, पदवीधर, आयटीआय, वेल्डर, फिटर, बी.एस्सी, एम.एस्सी, ट्रेनी, मार्केट डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह, डिप्लोमा, इंजिनिअरिंग, जीएनएम, बी.फार्म, एम.फार्म, एमबीए इ. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्रताधारक नोकरी इच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच नवउद्योजकांसाठी शासनाचे विविध महामंडळे व त्यांची कर्ज योजनांची माहितीसत्र आयोजित केली आहे.

इच्छुकांनी लाभ घेण्याचे आवाहन

नोकरी इच्छुक उमेदवारांनी नोंदणी पूर्ण करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करावे. तसेच १८ ऑक्टोबर रोजी स. १० वाजता रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. याबाबत काही अडचण असल्यास कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेट देऊन संपर्क साधावा, असे आवाहन जाधव यांनी केले आहे.

युवा महोत्सवात शास्त्रीय गायनाचे सादरीकरण

सुराज्य/मंगळवेढा

दलित मित्र कदम गुरुजी सायन्स महाविद्यालयात सादर होत असलेल्या युवा महोत्सवात सकाळी शास्त्रीय गायनाचे सादरीकरण झाले. स्वर साधना मंचावर एकूण १५ महाविद्यालयाने सारेगमपधनीसा या सात सुरांच्या आरोह - अवरोहातून राग आकारत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

शास्त्रीय गायन हा प्रकार अवघड वाटत असला तरी याला रसिकांनी मात्र उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गायनाला हार्मोनियम तबल्याची चांगली साथ मिळाली. संगीतातील रागावर आधारित विविध महाविद्यालयाने गीते सादर केली ठराविक अंतरावर ठराविक गतीने दिला जाणारा ठेका म्हणजे ताल युवकांनी धरला. प्रेक्षकांनीही त्याला भरभरून दाद दिली.

स्पर्धेचे परीक्षण कोल्हापूर येथील डॉ. आझाद नाईकवाडी, लातूर येथील प्राध्यापक शशिकांत देशमुख, सातारा येथील डॉ. स्पर्धा राजू उपाध्ये यांनी केले.

सिंहगडच्या विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये भरारी

एकाच महिन्यात ३० विद्यार्थ्यांची निवड

सुराज्य/सोलापूर

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्लेसमेंटमध्ये भरारी घेतली आहे. येथे अंतिम वर्षात शिकत असलेल्या ३० विद्यार्थ्यांची एकाच महिन्यात वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये प्लेसमेंटमधून निवड झाली.

यामध्ये सानिका शिर्के (पीटीसी ८ लाख रू.), श्रुती इंगळे आणि कृष्णात कापसे प्रत्येकी टीसीएस मध्ये ७ लाख रुपये, दिया कुडची (एचपीइ ५.२५ लाख रू.), इरण्णा पाटील, सौंदर्या सरगम, नागदत्त गज्जम, ऋषिकेश मगर, विजयालक्ष्मी इंजामुरी आणि समर्थ कलशेट्टी यांना प्रत्येकी ५ लाख रुपये, अतिश वायमारे (ट्रियांझ ४.५ लाख रू.), श्रीनिवास वायमारे, स्नेहल कोर्टेकर, दिया कुडची

सानिका शिर्के कृष्णात कापसे श्रुती इंगळे

यांना प्रत्येकी कॉग्निझटमध्ये ४ लाख रुपये, ऋतुजा गाडी (कॉग्निझट ४.५ लाख रू.), अथर्व शिर्के (कॉग्निझट ४.५ लाख रू.) आणि इवाय-जीडीएस (४.८३ लाख रू.) पॅकेज देऊन या सर्वांची निवड झाली आहे.

यामधील अनेक विद्यार्थ्यांची दोन कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणप्रणाली, उच्चशिक्षित व शिस्तप्रिय अनुभवी प्राध्यापक वर्ग यामुळे जगातील नामवंत कंपनीमध्ये विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या नोकऱ्या, सिंहगडचे विद्यापीठातील उत्कृष्ट निकाल, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी महाविद्यालय नेहमीच विविध उपक्रम राबवत असते.

अल्पावधीतच विद्यार्थी व पालक यांच्या विश्वासास पात्र ठरलेले सिंहगड हे सोलापूर जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय असून राष्ट्रीय स्तरावरील मानांकन प्राप्त असलेले सोलापूर जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय आहे. सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजला नॅशनल ॲक्रेडिटेशन अँड असेसमेंट कौन्सिल म्हणजे नॅक 'ए' ग्रेड मिळालेले नामवंत महाविद्यालय आहे.

या यशाबद्दल सिंहगडचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व शेखर जगदे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

आयएसए ज्योतीचे भूलतज्ज्ञ संघटनेकडून स्वागत

सुराज्य/सोलापूर

समाजामध्ये भूलशास्त्राविषयी, जीवन संजीवनी विषयी आणि भूलतज्ज्ञांविषयी जनजागृती निर्माण व्हावी याकरिता अखिल भारतीय भूलतज्ज्ञ संघटनेच्यावतीने काढण्यात आलेल्या आयएसए ज्योतीचे सोलापूर भूलतज्ज्ञ संघटनेकडून स्वागत करण्यात आले.

आयएसए सभागृहात हा सोहळा झाला. नागपूरहून निघालेली ही ज्योत चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, नांदेड, लातूरमार्गे सोलापुरात पोहचली. लातूर भूलतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र चव्हाण आणि सचिव डॉ. शशी पाटील यांनी ही ज्योत सोलापूर भूलतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. कविता निवर्गी यांच्याकडे सुपूर्द केली. इंडियन सोसायटी ऑफ ॲनेस्थोशिओलॉजिस्टस् या भूलतज्ज्ञांच्या अखिल भारतीय संघटना यावर्षी अमृत महोत्सव साजरा करत आहे. त्यानिमित्त आयएसए ज्योतीच्या माध्यमातून समाजामध्ये भूलशास्त्राविषयी, जीवन संजीवनी विषयी म्हणजेच व्यक्तींचे हृदय बंद पडल्यानंतर देण्यात येणाऱ्या प्रथमोपचाराबद्दल आणि भूलतज्ज्ञांविषयी महाराष्ट्रभर तसेच देशातील इतर राज्यांतही जनजागृती करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून रविवारी (दि.१६) जागतिक भूलशास्त्र दिनी हरियाणातील गुरुग्राममध्ये भारतातील भूलशास्त्रज्ञांचा महामेळावा होणार आहे. या मेळाव्यासाठी नागपूरहून आलेली ही आयएसए ज्योत सोलापूरस्थित महाराष्ट्र राज्य भूलतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा काटीकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार असून महाराष्ट्र राज्य भूलतज्ज्ञ संघटनेकडून ही ज्योत गुरुग्राम येथे नेण्यात येणार आहे.

भूलशास्त्राविषयी करताहेत जनजागृती

आयएसए ज्योतीच्या स्वागतावेळी महाराष्ट्र राज्य भूलतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा काटीकर, सोलापूर भूलतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. कविता निंबर्गी, सचिवा डॉ. वैशाली येमूल, डॉ. सेजल सुरतकल, डॉ. कविता उबाळे, डॉ. पुष्पा अग्रवाल, डॉ. वैशाली जोशी, डॉ. चक्रपाणी तुम्मा, डॉ. विद्यानंद चव्हाण, डॉ. गोरख रोकडे, डॉ. कैलास वायमारे आदी उपस्थित होते.

मळोलीत २४८ जणांची नेत्र तपासणी

वेळापूर : मळोली येथील चंद्रकांत ज्ञानेश्वर जाधव उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी माळशिरस तालुका व माजी उपसरपंच मळोली यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार रोजी एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय महंमदवाडी, हडपसर, पुणे व चंद्रकांत जाधव मित्र मंडळ मळोली यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोफत डोळ्याचे ऑपरेशन व अल्प दरात चष्मे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. देहू संस्थांचे माजी अध्यक्ष व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज ह. भ. प. गुरुवर्य बापूसाहेब मोरे महाराज देहूकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी नेत्रतज्ञ म्हणून डॉ. अभिजीत बर्गे व प्रियंका बर्गे नेत्र तपासणी साठी उपस्थित होते. शिवशंकर सोसायटीचे चेअरमन शशांक भैय्या पाटील, मळोली गावचे माजी उपसरपंच चंद्रकांत ज्ञानेश्वर जाधव, शिवशंकर सोसायटीचे माजी चेअरमन महादेव शिवाजी जाधव, प्रा.डॉ.योरपडे, तानाजी मारुती जाधव, जगन्नाथ जाधव, धर्मराज जाधव, अरुण पवार, ह. भ. प. विश्वनाथ सोपान जाधव, ह. भ. प. अण्णासाहेब जाधव, ह. भ. प. पृथ्वीराज श्रीरंग जाधव, माजी पोलीस पाटील आप्पासाहेब जाधव, चंदूकाका, अनिल जाधव, हनुमंत जाधव, हामू साहेब, संभाजी ढेंबरे, विकास सरगर, रत्नाई इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राजेंद्र पवार, नवनाथ जयसिंग जाधव, शशिकांत जाधव, संतोष योरपडे, बळीराम जाधव, अशोक जाधव, हरी (तात्या) जाधव, शिवाजी चांगदेव पवार, बाळासाहेब पांडुरंग जाधव, सुभाष तानाजी जाधव, शंकर जाधव, श्रीपती जाधव, सुरेश जाधव, भाऊ डॉक्टर, नितीन जाधव, युवराज जाधव, जयराम जाधव, सौरभ जाधव, अतुल नारायण जाधव, अमोल जाधव, नानासाहेब जाधव, युवा वर्ग व महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून डोळे तपासणी शिबिराचा २४८ लाभ घेतला. यामध्ये मोफत डोळ्याच्या ऑपरेशन साठी ३६ नागरिकांची नाव नोंदणी झाली असून लवकरच त्यांना ऑपरेशन साठी मंहमदवाडी या ठिकाणी पाठवले जाणार आहे. तसेच ८३ नागरिकांनी चष्म्याच्या नंबर साठी नाव नोंदणी केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवशंकर सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, सर्व संचालक, सभासद तसेच चंद्रकांत जाधव मित्र मंडळ व रत्नाई इंग्लिश मीडियम स्कूल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव मोरे यांनी केले. आभार प्रदर्शन अण्णासाहेब जाधव यांनी केले.

कै.शिवदास जानकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त डस्टबिन वाटप

वेळापूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांचे वडील शिवदास शंकर जानकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त वेळापूर ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामपंचायत पंधरावा वित्त योजनेतून वेळापुर गावातील कुटुंबांना डस्टबिनचे उत्तमराव जानकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच बाकडांचेही लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला वेळापूर उपसरपंच जावेद मुलाणी, काशिनाथ आडत, हनुमंत कदम, संदीपतात्या माने देशमुख, उमेश भानवसे, जवान माने देशमुख, हनुमंत वायदंडे, अण्णासाहेब बनसोडे, रणजीत सरवदे, लखन माने देशमुख, रायचंद खाडे ,अमोल मंडलिक, धनंजय शिवपुजे, महेश देवकते ,सुमित सखरे,अनंत गाडवे,विनायक माने,मनोज उरणे,अनंत जवंजाळ,केशव बंदपट्टे, सुरज जाधव, विठ्ठल जवंजाळ, नागेश नाईकनवरे व महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोटरी क्लब मोडनिंब २२-२३ चा पदग्रहण सोहळा

मोडनिंब : रोटरी क्लब च्या वतीने नूतन अध्यक्ष डॉक्टर रोटरियन शशिकांत वागज व नूतन सचिव रोटरी रो डॉ प्रशांत कोल्हे यांचा यावर्षीचा पदग्रहण सोहळा मोडनिंब या ठिकाणी आज संपन्न झाला. पीडीजी रो. विष्णू मोंढे व उपप्रांतपाल रो. डॉ. सुभाष पाटील यांच्या शुभहस्ते हा पदग्रहण सोहळा संपन्न झाला रोटरीचे २१-२२ चे अध्यक्ष मोहन कुंभार यांनी रो. डॉ. शशिकांत वागज यांना अध्यक्षपदाचा पदभार दिला व सचिव २१-२२ सावता घाडगे सर यांनी नूतन सचिव डॉक्टर प्रशांत कोल्हे यांना आपला पदभार दिला यावेळी तालुका वनाधिकारी श्री एच डी कोकाटे उपस्थित होते. प्रास्ताविक रोटरियन डॉक्टर अनिल गोळवलकर यांनी केले तर प्रमुख रोटरीन डॉक्टर सुभाष पाटील यांनी मोडनिंब रोटरी क्लबचा गौरव केला व गेली दहा वर्षे मोडनिंब रोटरी क्लब नी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन या पुढील कामात रोटरीने अधिक काम करावे असे आवाहन केले यावेळी पीडीजी विष्णू मुंडे यांनी रोटरी क्लबचा जगभर चालत असलेला कार्याचा आढावा घेऊन रोटरी २१० देशात काम करीत असून रोटरी फाउंडेशन ही जगात सर्वात श्रीमंत असलेली संस्था असून रोटरी गरिबासाठी काम करत असलेली संस्था आहे व सर्वांनी रोटरी मध्ये सामील व्हावे असे आवाहन केले यावेळी सर्व आजी माजी रोटरी सदस्य तसेच माढा रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते. आभार प्रदर्शन नूतन सचिव डॉ प्रशांत कोल्हे यांनी मानले.

सुराज्य सोलापूर
Classified

विवाह विषयक

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : **7387906921**
(071122)

पाहिजे

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : **8378851719**
(211022)

मोहन चव्हाण यांचे निधन

सोलापूर : मागास समाज सेवा मंडळ, नेहरूनगर सोलापूर या संस्थेचे सचिव व दलित मित्र कै. चंद्राम चव्हाण गुरुजी यांचे सुपुत्र, रुक्माई प्रतिष्ठान नेहरूनगरचे आधारस्तंभ मोहन चव्हाण वय ६८ यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या नेहरूनगर येथील राहते घरापासून उद्या सकाळी ११.३० वाजता निघणार आहे. बंजारा स्मशानभूमी प्रतापनगर रोड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या पश्चात २ मुले , १ मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी नगरसेविका अश्विनी चव्हाण यांचे ते पिता होत. मोहन चव्हाण हे बंजारा समाजातील मोठं व्यक्तिमत्त्व होतं.

चालू गळीत हंगामात साडेसहाशे टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट : दिलीप माने

▪ दिवाळीपूर्वी पहिला हफ्ता जमा करणार

सुराज्य/उत्तर सोलापूर

गेल्या दोन वर्षात कारखाना आर्थिक अडचणीत असतानाही सभासदाचे हफ्ते देण्यात आले.यंदाच्या गळीत हंगामातही साडे सहाशे मेट्रिक टन ऊस गाळापाचे उद्दिष्ट असून सोलापूर जिल्ह्यातील सर्वात जास्त ऊस गाळप होईल असे सिध्दनाथ शुगर मिलचे अध्यक्ष दिलीप माने यांनी म्हटले आहे.

उत्तर तालुक्यातील तिऱ्हे येथील सिध्दनाथ शुगर मिलच्या १२ व्या गळीत हंगामाचे मोळी पूजन,स्व ब्रह्मदेव दादा माने यांच्या प्रतिमा पूजनाने उदघाटन खानापूर सांगलीचे माजी आमदार सदाशिवराव पाटील, माण(सातारा) चे आमदार जयकुमार गोरे यांच्या हस्ते अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, संचालक धनंजय भोसले, जनरल मॅनेजर संजीवकुमार जाधव, बी एम आय टीचे संचालिका जयश्री माने, केतन शहा, काँग्रेसचे दक्षिण तालुकाध्यक्ष गंगाधर बिराजदार, बाळासाहेब माने यांची प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. पुढे बोलताना कोरोना महामारीमुळे तांत्रिक व आर्थिक अडचणी आल्या,अनेक शेतकऱ्यांची ऊस जागेवर पडुन खराब झाला. नुकसान बघवले जात नव्हते.सामाजिक बांधीलकीतून योग्य ती मदत देण्यात आली. कारखान्याचे सर्व सभासदाचे हफ्ते वेळेवर देण्यात आले.यंदाच्या गळीत हंगाम आपल्या सर्वांच्या आशीर्वादाणे जिल्ह्यात गाळपात उच्चाक निर्माण करेल असा विश्वास माने यांनी व्यक्त केला. यावेळी एड इंद्रजित पाटील, आण्णाराव भोपळे, निखिल भोसले, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, रामभाऊ हक्के, बाळासाहेब सुरवसे, सुनील जाधव, बाळासाहेब पाटील, आप्पासाहेब काळे, उमेश भगत, भगवान कदम, सचिन गुंड यांच्यासह पृथ्वीराज माने युवा मंच कार्यकर्ते, शेतकरी, शुगर मिल मधील अधिकारी कर्मचारी, ब्रम्हदेव माने शिक्षण संकुलातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक पृथ्वीवराज माने, आभार संचालक धनंजय भोसले यांनी मानले.

निकृष्ट नियोजनामुळे सहकार विभाग बदनाम झाले. वैयक्तिक हेतू पूर्ण करण्यासाठी,सामूहिक विकासाला दुय्यम स्थान देण्यात आले.लाखो करोडोंचा घोटाळा सहकारी संस्थेत झाले.खासगीकरण झाल्याने मालकशाही निर्माण झाली आहेत.वेळीच नियम घातले नाहीत तर भविष्यात मोठी अडचणी निर्माण होतील.
- सदाशिव पाटील, माजी आमदार

ऊत्तम कौशल्य ,योग्य नियोजनामुळे कारखाना उभा केला आहे. उत्तर तालुक्यासह मोहोळ,दक्षिण अनेक शेतकरी व त्यांचे कुटुंब,विद्यार्थ्यांना शिक्षना ही संधी उपलब्ध करून दिल्याने आयुष्य फुलवले आहे.
- जयकुमार गोरे, आमदार

धोत्री येथील गोकुळ शुगरकडून २ हजार २१ रुपये दर देण्याची घोषणा

सुराज्य/अक्कलकोट

मागील वर्षी गाळप केलेल्या कार्य क्षेत्रातील उसाला धोत्री येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रीजने प्रति टन २१२१ रुपये दर देण्याची घोषणा कारखान्याचे चेअरमन दत्ता शिंदे यांनी केली. दिवाळीपूर्वी उर्वरित रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

आगामी गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक, शेतकरी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक कारखाना स्थळावर बोलावण्यात आली होती. या बैठकीत त्यांनी ही घोषणा केली. कार्यक्षेत्रातील उसाचे क्षेत्र, नवीन लागवड, याचा त्यांनी आढावा घेतला. यंदा कार्यक्षेत्रातील उसाची लागवड वाढली आहे. त्यामुळे १५ ऑक्टोबर पासून कारखाना गळीत हंगामासाठी सज्ज करण्यात आला आहे. गतवर्षी ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना प्रत्येकी २० किलो साखर प्रति किलो २० रुपये दराने कारखान्याच्या विभागीय कार्यालयात वितरित करण्यात येणार आहे. मागील वर्षाच्या उसाची एफआरपीची रक्कम प्रति टन २ हजार रुपये प्रमाणे यापूर्वीच ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम तातडीने शेतकऱ्यांना अदा केली जाणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. बैठकीला कारखान्याचे संस्थापक बलभीम शिंदे, त्यांच्या सुविद्य पत्नी शोभा शिंदे, चेअरमन दत्ता शिंदे यांच्या सुविद्य पत्नी प्रीती शिंदे, कार्यकारी संचालक कपिल शिंदे, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर विशाल शिंदे, तुळजाभवानी कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, संचालक गणपत शिंदे,कुसुम शिंदे, माजी सभापती कल्याणराव पाटील, माजी उपसभापती स्वामीराव पाटील, निवृत्त मुख्याध्यापक शिवाजीराव पाटील, उद्योजक अभिनंदन गांधी, लाला राठोड, सागर संतांनी, प्रदीप गायकवाड, मोट्याळचे सरपंच कार्तिक पाटील, बाबासाहेब पाटील,जनरल मॅनेजर प्रदीप पवार, अभिजीत गुंड, शेती अधिकारी शेंडगे जहागीरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

१० लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

गोकुळ शुगरच्या परिसरात वाढलेले उसाचे क्षेत्र आणि कारखान्याची वाढीव गाळप क्षमता याचा विचार करता यंदाच्या गळीत हंगामात कारखान्याने दहा लाख मॅट्रिक टन उस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याची माहिती चेअरमन दत्ता शिंदे यांनी दिली. यावेळी कारखान्याच्या कामगारांना एक महिन्याचा पगार बक्षीस म्हणून तर एक महिन्याचा पगार बोनस असा दोन महिन्याचा पगार देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रेल्वे प्रवासात प्रवाशांची बॅग चोरी

सुराज्य/कुर्डूवाडी

रेल्वेतुन प्रवास करीत असलेल्या प्रवाशांची बॅग आश्रत चोरट्यांनी चोरून नेली. बॅगेतील सुमारे ४३ हजारांचा ऐवज चोरीला गेला. ही घटना रविवार दि. ९ रोजी बिदर एक्सप्रेस मध्ये घडली. याबाबत बालाजी विनायक पाटील (रा. तुलींज पो.ठाणे नालासोपारा, पूर्वभाइंदर, वसई विरार जि.पालघर) यांनी अज्ञात चोरट्याविरुध्द कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी बालाजी पाटील रविवार दि. ९ रोजी बिदर एक्सप्रेसने पुणे ते उदगीर असा बोगी नं एस-६/सीट नं ७ वरुन झोपून प्रवास करत होते. दरम्यान गाडी उस्मानाबाद रेल्वे स्थानकावरुन पहाटे ५ वाजता दरम्यान थांबून निघाली असता अंगाने सडपातळ, पांढऱ्या व काळ्या रंगाचा चेक्सचा फुलशर्ट घातलेल्या अज्ञात इसमाने बॅग चोरून नेली.

यामध्ये ३२ हजारांचा मोबाइल, ९ हजार रुपये रोख, इतर कागदपत्रे व बॅग असा एकूण ४३ हजार रुपयाचां ऐवज होता. फिर्यादी बालाजी विनायक पाटील यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द कुर्डूवाडी रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पो.कॉ. पांचाळ करत आहेत.

वेळापूर-शेंडेचिंच-तांदुळवाडी रस्त्यास दर्जोन्नती

शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नांना यश

सुराज्य/अकलूज

आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार वेळापूर शेंडेचिंच तांदूळवाडी रस्त्यास दर्जान्नोती मिळावी म्हणून शासनाकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून या मार्गास प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जान्नोती मिळाली असल्याची माहीती माजी जिल्हा परीषद सदस्या शितलदेवी मोहिते-पाटील यांनी दिली.

तांदुळवाडी शेंडेचिंच या गावची लोकसंख्या जवळपास पंधरा हजार असून ही गावे वेळापूर व पुढे अकलूज बाजारपेठेशी जोडलेली असल्या कारणाने या मार्गावरून शिक्षणा करीता विद्यार्थी, व्यापारी, शेतीमाल, रूग्णालया करीता या मार्गे दळणवळण-वाहतूक मोठ्याप्रमाणात होते,तसेच पंढरपूर आषाढी व कार्तिकी वारीच्या वेळेस या मार्गाचा पर्यायी रस्ता म्हणून वापर केला जातो व हा पंढरपूर-पुणे, पंढरपूर-सातरा पालखी रस्त्यास जोडणारा मार्ग आहे, या नागरिकांच्या सुविधे करीता सर्व बाबी लक्षात घेता शितलदेवी मोहिते-पाटील यांनी २४ सप्टेंबरच्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत या मार्गाच्या दर्जोन्नती करण्यासाठी ठराव मंजूर करून घेतला व आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व आ.राम सातपुते यांच्या माध्यमातून राज्यसरकारकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळापूर शेंडेचिंच तांदूळवाडी या १६ कि.मीच्या रस्त्यास प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जावाढ दिली आहे. वेळापूर शेंडेचिंच तांदुळवाडी महीम प्रमुख जिल्हा मार्ग दर्जान्नोती मिळाल्याने या गावातील ग्रामस्थांनी शितलदेवी मोहिते-पाटील यांचे आभार व्यक्त केले या मार्गावरील दळणवळ-वाहतूक सुकर होणार असून रस्तेविकासाला अधिकचा निधी मिळणार आहे.

कारंब्याला पाणी योजनेसाठी १ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर

उत्तर सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा गावासाठी नव्याने नळ पाणीपुरवठा योजना केंद्र आणि राज्य शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत नव्या पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. सुमारे १ कोटी ४० लाख रुपयांचा निधीही मंजूर झाला असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच कौशल्या विनायक सुतार यांनी दिली.

माजी सहकारमंत्री आणि आमदार सुभाषबापू देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, पंचायत समिती माजी सदस्य इंद्रजीत पवार यांच्या सहकार्याने योजना मंजूर झाली. या योजनेतून मार्डी रस्त्यावरील सध्याच्या पाणी योजनेच्या विहिरीचे खोलीकरण, आणखी एक बोअरवेल घेऊन, पाणीही या विहिरीत टाकण्यात येणार आहे. विहिरीपासून गावापर्यंत नेलेली जुनी जलवाहिनी बदलून संपूर्णपणे नवीन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. गावात पाणी साठवण्यासाठी सुमारे दीड लाख लिटर क्षमतेची नवीन पाणी टाकीही बांधण्यात येणार आहे. ठराविक ठिकाणी सार्वजनिक नळही बसवण्यात येणार आहेत. नव्या योजनेमुळे गावातील प्रत्येक घराला भरपूर आणि नियमित पाणी देणे शक्य होणार आहे. कारंबा गावच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सुटणार आहे. लवकरच काम मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहोत.असे ही त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० गेम चेंजर ठरणार

एमआयटी पुणेचा चौथा दीक्षांत समारंभ, ४ हजार ५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

सुराज्य/सोलापूर

समाजाच्या विकासाठी आणि गुणवत्तापुरक शिक्षण प्रदान करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण महत्वाचे ठरत असते. केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासह समाजातील विविध समस्यांचे निराकरण, संशोधनातून विकास घडविता येईल. उच्च गुणवत्तापूर्ण संशोधनात्मक शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळावे. ज्ञानाची उत्पत्ती आणि संशोधनाचे वातावरण निर्मितीसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० गेम चेंजर ठरेल, असे मत भारत सरकारचे परराष्ट्र व्यवहार व शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा चौथा दीक्षांत समारंभ शनिवारी विश्व सभामंडप, विश्वराजबाग, लोणी-काळभोर, पुणे येथे पार पाडला. यावेळी विद्यापीठाच्या ४५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारत सरकारचे परराष्ट्र व्यवहार व शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग बोलत होते. यावेळी इस्त्रोचे माजी अध्यक्ष व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. के. कस्तुरीरंगन हे सन्माननीय अथिती म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरु डॉ. आर.एम. चिटणीस, प्र कुलगुरु डॉ. मिलिंद पांडे, प्र कुलगुरु प्रा. तपन पांडा, डॉ. प्रसाद खांडेकर, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे आणि परिक्षा नियंत्रक प्रा. गणेश पोकळे आदी उपस्थित होते.

या दीक्षांत समारंभरात बीटेक मधील केवल पद्मवार याला फाउंडर प्रेसिडेंट मेडल व बॅचलर ऑफ एज्युकेशनचे मिनू कलिता यांचा एक्जीकेटीव्ह प्रेसिडेंट मेडलने गौरव करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, रौप्य आणि कास्य पदक देण्यात आले. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, व्यवस्थापन (यूजी व पीजी), लिबरल ऑर्टस, बीएड, फाइन ऑर्टस, मिडिया ॲण्ड पत्रकारिता, वाणिज्य, अर्थशास्त्र, विज्ञान,फॉर्मसी, सस्टेनेबल स्टडीज, डिझाइन, गर्व्हनन्स इ. शाखेत मिळून एकूण ४५७६ विद्यार्थ्यांना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली.

पद्मविभूषण डॉ. के. कस्तुरीरंगन म्हणाले, समाजाच्या विकासासाठी आणि व्यक्तिमत्व विकासासाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण प्रदान करण्याचे कार्य एमआयटीच्या माध्यमातून होत आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा अतिशय महत्वाचा दिवस आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, मुल्यात्मक शिक्षण देण्याचा आमचा मानस आहे. पालकांना आपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ ज्ञानाचे दालन म्हणून उदयाला येईल. सुख-समाधान आणि शांतीचा मार्ग दाखविण्याचे दायित्व भारताचे आहे. शिस्त आणि चारित्र्य हे खरे शिक्षण आहे . हे शिकविण्याचे कार्य येथून शिक्षणाच्या द्वारे केले जात आहे. विज्ञान आणि आध्यात्माची सांगड यालून शिक्षण प्रदान करण्याचे कार्य व्हावे. मूल्याधिष्टित शिक्षणपद्धतीनेच विद्यार्थ्यांचा सर्वगुण संपन्न असा नागरिक निर्माण होईल भविष्यात भारतीय संस्कृती जगाला मार्ग दाखवेल.

राहुल कराड म्हणाले, भारताला जगात शिखरावर घेऊन जाणारी पिढी घडविण्याचे कार्य विद्यापीठातून होत आहे. रोजगारासोबतच समाजाचा जबाबदार व्यक्तिमत्व घडविण्याची आमची जबाबदारी आहे. विविध विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी समाज आणि देशाच्या कल्याणाचा विचार करावा. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे धैय्य साध्य व्हावे. दरम्यान, पीस स्टटीज् साठी आम्ही अभ्यासक्रम तयार केला आहे.

डॉ.आर.एम. चिटणीस यांनी प्रस्ताविक केले. प्रा. गौतम बापट, प्रा. चायनिका बसू व प्रा पौर्णिमा बागची यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गणेश पोकळे यांनी आभार मानले.
- जनसंपर्क विभाग,
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे

...तर मुस्लीम समाज दुसरं लग्न करु शकत नाही

मुस्लीम पुरुषांच्या एकाहून अधिक लग्नासंबंधी उच्च न्यायालयाची महत्त्वाची टिप्पणी

सुराज्य/अलाहाबाद

जर एखादी मुस्लीम व्यक्ती आपल्या पत्नी, मुलांचा सांभाळ करण्यास सक्षम नसेल, तर 'कुराण'नुसार तो दुसरं लग्न करु शकत नाही, अशी टिप्पणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने केली आहे. 'कुराण'नुसार एखादी व्यक्ती अनाथांना न्याय देत नाही, तोपर्यंत दुसरं लग्न पवित्र होऊ शकत नाही असेही न्यायालयाने म्हटले आहे. एका मुस्लीम व्यक्तीने दाखल केलेली याचिका फेटाळताना न्यायालयाने हे निष्कर्ष नोंदवले.

अलाहाबाद हायकोर्टाचा मोठा निर्णय

न्यायमूर्ती सूर्य प्रकाश केसरवानी आणि राजेंद्र कुमार-चतुर्थ यांनी सांगितलं की कुराणमधील आदेश सर्व पुरुषांना अनिवार्य आहे, ज्यामध्ये मुस्लीम पुरुषांना अनाथांना योग्य वागणूक देण्यास सांगण्यात आलं आहे. पुरुष आपल्या आवडीच्या दोन, तीन किंवा चार महिलांशी लग्न करु शकतो. पण जर त्या पुरुषाला आपण त्यांना योग्य न्याय देऊ शकणार नाही याची भीती वाटत असेल किंवा आपल्या पहिल्या पत्नी, मुलांचा योग्य सांभाळ करण्यास सक्षम नसेल तर तो दुसरं लग्न करु शकत नाही.

काय आहे प्रकरण?

मुस्लीम व्यक्तीने दुसरे लग्न केल्यानंतर त्याच्या पहिल्या पत्नीला याची माहिती दिली नव्हती. मात्र, आपल्याला दोन्ही पत्नींसोबत राहायचे होते. पण पहिल्या पत्नीने त्याच्यासोबत राहण्यास नकार दिला. वैवाहिक हक्क मिळावेत यासाठी तिने याचिका दाखल केली होती. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर कौटुंबिक न्यायालयाने पतीची याचिका फेटाळली होती. न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

उच्च न्यायालयाने काय म्हटले?

उच्च न्यायालयाने पतीची याचिका फेटाळून लावताना सांगितले की पहिल्या पत्नीपासून आपले दुसरे लग्न लपवणे हे क्रूरतेप्रमाणे आहे. जर पत्नी पतीसोबत राहू इच्छित नसेल तर, वैवाहिक अधिकार मिळवण्यासाठी तिच्यावर एकत्र राहण्यासाठी जबरदस्ती केली जाऊ शकत नाही'.

पहिली पत्नी आणि मुलांचा सांभाळ करण्यास सक्षम नसल्यास पतीने दुसरे लग्न करण्यापासून स्वत:ला थांबवायला हवे होते असेही न्यायालयाने याचिका फेटाळताना नमूद केले.

ठाकरे-शिंदेंच्या वादाला जनता कंटाळली : राज ठाकरे

सुराज्य/मुंबई

राज्यात शिवसेनेची दोन शकले होऊन ठाकरे गट आणि शिंदे गटात जोरदार संघर्ष सुरु असतानाच आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (MNS) पदाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. आगामी महानगरपालिका निवडणुका आपल्याला स्वबळावर लढायच्या आहेत. त्यासाठी कामाला लागा. तुम्ही फक्त प्रामाणिकपणे काम करा. तुम्हांला सत्तेत बसवण्याची जबाबदारी माझी, असे राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. ते मंगळवारी रंगशारदा येथे मनसे पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते.

यावेळी राज यांनी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटाच्या वादावर फार थेटपणे भाष्य केले नाही. परंतु, राज्यातील जनता सध्याच्या राजकारणाला वैतागली आहे.

अनेक लोकांनी दोन्ही दसरा मेळावे पाहिले नाहीत. याउलट मनसेबाबत लोकांमध्ये सकारात्मक वातावरण आहे. याचा फायदा घ्या. दिवाळीत घरोघरी जाऊन प्रचार करा. सकारात्मक आणि प्रामाणिकपणे काम करा. तुम्हाला सत्तेत बसवण्याची जबाबदारी माझी. तसेच सत्ता आल्यावर मी तुम्हांलाच पदावर बसवेन, मी कोणतेही पद येणार नाही, अशी खोचक टिप्पणी राज ठाकरे यांनी केली. राज ठाकरे यांच्या आजच्या बैठकीनंतर मनसे महानगरपालिका निवडणुकांच्यादृष्टीने जोमाने कामाला लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

सध्याच्या राजकारणाला जनता कंटाळल्याने आता त्यांच्यासमोर मनसे हा एकच पर्याय शिल्लक राहिला आहे. त्यामुळे पालिका निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला 'न भूतो न भविष्यती' विजय मिळेल, असा आशावादही राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

पुण्यात रस्त्यावरच खुनी खेळ

रिक्षा चालकाची कोयत्याने निर्घृण हत्या

पुणे : चाकण परिसरातून पाठलाग करून कोयत्याने सपासप वार करून एका रिक्षा चालकाची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. हल्लेखोरांनी पाठलाग करून ही हत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. चाकण - रोहकल रस्त्यावर हा सर्व प्रकार घडला आहे.

पूर्व वैमनस्यातून ही घटना घडली असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. युसुफ अर्षद काकर (वय १९, रा. खंडोबा माळ, चाकण, ता. खेड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

रेल्वेतील सफाई कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची टांगती तलवार

मुंबई: एकीकडे देशभरात मोठा गाजावाजा करीत 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात येत आहे. तर दुसरीकडे पोटाची खळगी भरण्यासाठी साफसफाईचे काम करणाऱ्या सफाई कामगारांवर बेरोजगारीची टांगती तलवार लटकू लागली आहे. गेली पाच वर्षे मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर कंत्राटी पध्दतीने सफाईचे काम करणाऱ्या कामगारांना नवीन कंत्राटदाराने बाहेरचा रस्ता दाखविला आहे. त्यामुळे या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

रेल्वेच्या आरक्षित कक्षात चोरी; रेल्वेला भरपाईचा आदेश

पुणे : रेल्वेच्या आरक्षित कक्षात महिला प्रवाशाकडील ऐवज चोरीला गेल्या प्रकरणी अतिरिक्त जिल्हा ग्राहक आयोगाने मध्य रेल्वे प्रशासनाला पाच लाख १२ हजार ७०० रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले. आयोगाचे अध्यक्ष जे. व्ही. देशमुख, सदस्य शुभांगी दुनाखे, अनिल जवळेकर यांनी याबाबतचे आदेश दिले. याबाबत वडगांव शेरी भागातील रहिवाशी महिलेने वकील ॲड. अर्धापुरे यांच्यामार्फत मध्य रेल्वे प्रशासन, स्थानक प्रमुख आणि मनमाड रेल्वे प्रशासनाच्या व्यवस्थापकांच्या विरोधात अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात तक्रार दाखल केली होती.

मोटारींच्या काचा फोडून चोरी करणारी टोळी सक्रीय

पुणे : मोटारींच्या काच फोडून ऐवज चोरणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. डेक्कन जिमखाना आणि बाणेर रस्ता भागात मोटारींच्या काचा फोडून चोरट्यांनी लॅपटॉप, रोकड असा मुद्देमाल लांबविला. डेक्कन जिमखाना भागातील किवरकर हॉस्पिटलसमोरील गल्लीत लावण्यात आलेल्या मोटारीची काच फोडून चोरट्यांनी पाच हजार रुपये, गाडीची चावी, सोन्याची चमकी असा मुद्देमाल लांबविला. याबाबत डेक्कन पोलीस ठाण्यात मोटारचालकाने तक्रार दिली आहे. डेक्कन जिमखाना भागातील बीएमसीसी रस्त्यावर मोटारीची काच उघडी असल्याची संधी साधून ३३ हजार रुपयांचा लॅपटॉप चोरण्यात आला.

२१व्या शतकातील शिक्षकांमध्ये कौशल्याचा अभाव

पुणे : सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या सिम्बायोसिस लॉ स्कूलतर्फे इरासमस प्लस सीबीएचई प्रकल्पासाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील विविध शिक्षण मंडळाच्या शाळांतील शिक्षकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात शिक्षकांमध्ये २१व्या शतकातील कौशल्याचा अभाव असल्याचे, तर विद्यापीठांमध्ये विद्यार्थिकेंद्रित रोजगारक्षम कौशल्य विकसन करण्याची गरज असल्याचे दिसून आले.

शिंदे सरकारच्या शाळा बंद निर्णयाविरोधात विद्यार्थ्यांचे 'दप्तर घ्या, बकऱ्या द्या' आंदोलन

सुराज्य/नाशिक

नाशिक जिल्हापरिषद समोर विद्यार्थ्यांनी 'दप्तर घ्या, बकऱ्या द्या' आंदोलन करुन साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. बंद झालेली शाळा सुरू करण्याच्या मागणीसाठी इगतपुरीतील विद्यार्थ्यांचे अनोखे आंदोलन पाहायला मिळाले. शासन निर्णयानंतर दरेवाडीतील जिल्हा परिषद शाळा बंद करण्यात आली. या शाळेमध्ये ४० ते ४५ विद्यार्थी शिकत होते. शाळा बंद केल्याने विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद कार्यालयावर बकरी घेऊन मोर्चा काढला आहे.

राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला आहे. यासंदर्भातील निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीला देखील सुरुवात झाली आहे. असे असले तरी या निर्णयाविरोधात पालक-विद्यार्थ्यांकडून निषेध नोंदविला जात आहे. याचाच एक भाग म्हणून नाशिकच्या जिल्हा परिषदेत झालेल्या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतल आहे. हे आंदोलन कुठल्या कामगार युनियन किंवा संघटनेचे नसून हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे होतं. हे आंदोलन विद्यार्थ्यांनी हक्काचं शिक्षण मिळावं यासाठी करण्यात आलं आहे. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात असलेल्या दरेवाडी या अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी हे आंदोलन पुकारले आहे.

शाळा बंद केल्याने या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे बकरी घेऊन विद्यार्थ्यांचा मोर्चा जिल्हा परिषद कार्यालयावर धडकला. या विद्यार्थ्यांनी थेट नाशिक जिल्हा परिषदेसमोर 'दप्तर घ्या बकऱ्या द्या, आंदोलन छेडलंय. आमची शाळा बंद केल्याने आता बकऱ्या चारण्याशिवाय आमच्याकडे पर्याय उरला नाहीये. त्यामुळे आता काहीच कामाचे न राहिलेले आमचे दप्तर जिल्हा परिषदेला जमा करून त्यांच्याकडून बकऱ्या घेण्यासाठी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी थेट जिल्हा परिषद भवनावर आक्रोश मोर्चा नेत अनोखे आंदोलन छेडले.

भाजपच्या शहराध्यक्षाची स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या

सुराज्य/बीड

भाजपाच्या शहराध्यक्षाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बीडमध्ये घडली. भाजपाचे बीड शहराध्यक्ष भगीरथ बियाणी यांनी राहत्या घरात स्वत: वर गोळी झाडून आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपाच्या शहराध्यक्षाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बीडमध्ये घडली. भाजपाचे बीड शहराध्यक्ष भगीरथ बियाणी यांनी राहत्या घरात स्वत: वर गोळी झाडून आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी बियाणी यांच्या घराची पाहणी केली. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर बियाणी यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. दरम्यान, गोळीबाराचा आवाज ऐकू आल्यामुळे एकच खळबळ उडाली. बियाणी यांच्या खोलीत जाऊन पाहिले असता ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

दिवाळीत कांदा रडवणार, दरात तेजी येण्यास सुरुवात

सुराज्य/नवी मुंबई

गेल्या आठ महिन्यांपासून रोडावलेल्या कांद्याच्या दराने आता उसळी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे घाऊक बाजारात मागील आठवड्यापर्यंत ७ ते १० रुपये किलो असलेल्या कांद्याच्या दरात आता वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी, एक किलो कांदा १५ ते २५ रुपये किलो झाला आहे. उत्तम दर्जाच्या नवीन कांद्याला २५ ते २७ रुपये किलोचा भाव मिळत आहे. परतीच्या पावसाने लांबवलेला मुक्काम, परिणामी संकटात सापडलेली नवीन लागवड... त्यामुळे कांद्याच्या दरात तेजी येण्यास सुरुवात झाली असल्याचे व्यापारी सांगत आहेत. येत्या काळात हे दर असेच वाढत राहणार असल्याचा अंदाज व्यापारी वर्तवत असल्याने दिवाळीत कांदा रडवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

याऊक बाजारात दररोज कांद्याच्या ७० ते ८० गाड्या येत असतात. बाजारात येणारा कांदा उत्तम दर्जाचा असला तरी कांद्याला काही दिवसांपासून हवा तसा उठाव मिळत नव्हता. त्यात पावसानेही मुक्काम लांबवला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याच्या चाळीला पाणी लागण्यास आणि त्यामुळे कांदा खराब होण्यास सुरुवात झाली आहे. हा भिजत चाललेला कांदा जास्त वेळ साठवून ठेवता येणार नसल्याने शेतकऱ्यांना हा कांदा बाजारात पाठवावा लागणार आहे.

साडेचार महिन्याच्या अनाथ बालिकेला मिळाले सिंगापूरचे पालक

सुराज्य/अकोला

उत्कर्ष शिशुगृहातील साडेचार महिने वयाची बालिका ही सुधारीत कायद्यानुसार दत्तक म्हणून सिंगापूरच्या पालकांनी घेतली आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विलास मरसाळे यांनी दिली आहे. देशातील ही पहिली दत्तक प्रक्रिया अकोल्यात नोंदवली गेली आहे.

देशातील पहिली दत्तक प्रक्रिया ठरली

अकोल्यातील उत्कर्ष शिशुगृहात जानेवारी २०२२ मध्ये एक बालिका आणण्यात आली. यावेळी ही बालिका केवळ ४-५ दिवसांची होती. बालगृहात तिचे संगोपन सुरू होतेच. दरम्यान, 'कारा' या अनाथ बालकांचे देशांतर्गत तसेच आंतरदेशीय दत्तक पालकत्व प्रक्रियेचे काम करणाऱ्या संस्थेकडे सिंगापूर येथील भारतीय दाम्पत्याने बालकासाठी मागणी नोंदवली होती. त्या पालकांपर्यंत या बालिकेची माहिती पोहोचवण्यात आली. त्यांनी ही बालिका दत्तक घेण्याचे मान्य केले. त्यानंतर उत्कर्ष शिशूगृहातील अधीक्षक प्रीती दांदळे यांनी हा प्रस्ताव जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विलास मरसाळे यांच्याकडे पाठवला. त्याप्रमाणे बालन्याय अधिनियम २०१५ मधील सुधारीत तरतूदींनुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे हे प्रकरण सुनावणीसाठी ठेवण्यात आले. या प्रकरणात तीन सुनावण्या झाल्या. या सुनावण्यांना पालकांना जिल्हाधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष हजर रहावे लागले. या सुनावण्यांनंतर गुरुवारी जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी या बालिकेस तिच्या पालकांकडे हस्तांतरीत करण्याचे आदेश जारी केले. नव्या सुधारणांनुसार अशाप्रकारे दत्तक प्रक्रिया करणारा अकोला हा पहिला जिल्हा ठरला आहे.

संधीवाताने ग्रासलेल्या रुग्णांसाठी कमी वेदनादायी शस्त्रक्रिया

सुराज्य/पुणे : भारतातील सुमारे २३.४६ दशलक्ष नागरिकांना संधीवाताचा त्रास होतो. पाच पैकी एका रुग्णाला गुडघे प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची गरज भासते. प्रत्यारोपणाची गरज भासणाऱ्या बहुतांश रुग्णांना गुडघ्याच्या एकाच कप्प्यात संधीवाताचा त्रास होतो. तेवढ्याच कप्प्यातील शस्त्रक्रिया केल्याने संधीवात बरा होणे शक्य आहे. ही शस्त्रक्रिया कमी वेदनादायी असल्याने रुग्ण लवकरात लवकर दैनंदिन कामकाज करु शकतो, असे मत डॉ. सिनुकुमार भास्करन् यांनी व्यक्त केले.

पालघर साधू हत्याकांड प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

सुराज्य/मुंबई : पालघर साधू हत्याकांड प्रकरणासंदर्भात एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या हत्याकांडाचा तपास आता सीबीआयकडे वर्ग करण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली आहे.

महाराष्ट्र सरकारने या प्रकरणाचा तपास हस्तांतरण करण्यास काही हरकत नसल्याचे म्हटले आहे. तसेच यासंदर्भातील शपथपत्रही सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आहे. पालघर साधू हत्याकांड प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यास मंजुरी असल्याचे महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे.

या प्रकरणी आत्तापर्यंत २०० जणांना अटक करण्यात आली आहे. तर नोव्हेंबर २०२२ मध्ये अटक करण्यात आलेल्या ५८ जणांना जामीन मंजूर केला आहे. तर डिसेंबर २०२० मध्ये यातील ४७ आरोपींना ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाने प्रत्येकी १५ हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला.

वडिलांच्या पावलावर पाऊल

धनंजय चंद्रचूड होणार देशाचे नवे सरन्यायाधीश

सुराज्य/नवी दिल्ली

२०२२ या एका वर्षात तीन मुख्य न्यायाधीश देशातील सर्वात मोठ्या न्यायालयाचे नेतृत्व करणार आहेत. ऑगस्ट २०२२मध्ये न्यायाधीश एनव्ही रमण्णा सेविनिवृत्त झाले. त्यानंतर त्यांच्या जागी सध्याचे विद्यमान सरन्यायाधीश उदय उमेश ललीत यांनी शपथ घेतली. सरन्यायाधीश उदय ललीत यांचा कार्यकाळ येत्या नोव्हेंबरमध्ये संपुष्टात येणार आहे. त्यामुळे निवृत्त होणारे सरन्यायाधीश नव्या सरन्यायाधीशांच्या नावाची शिफारस करतात. त्यानुसार ललीत यांनी न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नावाची शिफारस केली आहे. देशाचे भावी सरन्यायाधीश म्हणून मराठमोळे धनंजय चंद्रचूड हे शपथ घेऊ शकतात. विद्यमान सरन्यायाधीश ललीत यांच्यानंतर धनंजय चंद्रचूड हे सर्वात वरिष्ठ न्यायमूर्ती आहेत. त्यामुळं ललीत यांनी चंद्रचूड यांची केंद्राकडे शिफारस केली आहे.

न्या. धनंजय चंद्रचूड यांना ही मोठी संधी मिळाली आहे. त्यांच्या आई प्रभा या शास्त्रीय संगीतकार होत्या. वडील न्या. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी सरन्यायाधीशपद भूषवले. वडिलांचा वारसा चालवत न्या. धनंजय यांनी आतापर्यंत उल्लेखनीय कामगिरी केली. महत्त्वाच्या व सार्वजनिक हिताच्या न्यायनिवाड्यांद्वारे न्यायदान करण्याबरोबरच कायद्याच्या विद्यार्थ्यांना अध्यापन, महाराष्ट्रातील न्यायाधीशांना प्रशिक्षण, विधी व न्यायाशी संबंधित लेखन आणि विद्यापीठांमध्ये व्याख्याने असे विविधांगी काम त्यांनी केले आहे.

११ नोव्हेंबर १९५९ रोजी जन्मलेले न्या. धनंजय यांचे शालेय शिक्षण मुंबईत कॅथेड्रल अँड जॉन कॉनन स्कूल व दिल्लीतील सेंट कोलंबाज स्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी नवी दिल्लीत सेंट स्टिफन्स कॉलेजमधून अर्थशास्त्र व गणित विषयात पदवी मिळवली.

१९८२मध्ये दिल्ली विद्यापीठात एलएलबी पदवी केल्यानंतर १९८३मध्ये त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात एलएलएम केले. हार्वर्डमध्ये त्यांच्या यशाबद्दल त्यांना जोसेफ बेल पारितोषिक लाभले. त्यानंतर तेथेच त्यांनी 'ज्युरिडिकल सायन्सेस' या विषयात डॉक्टरेट मिळवली. १९८८ ते ९७मध्ये वकिली करत असताना त्यांनी मुंबई विद्यापीठात 'कम्पॅरेटिव्ह कॉन्स्टिट्युशनल लॉ' या विषयाचे अध्यापन केले. वकिली करताना त्यांनी एचआयव्ही पॉझिटिव्ह कर्मचाऱ्यांना असलेले हक्क, कंत्राटी कामगारांचे हक्क अशा अनेक जनहित याचिकांमध्ये बाजू मांडली. त्याशिवाय आरबीआय, पोर्ट ट्रस्ट, महापालिका, विद्यापीठ अशा अनेक सरकारी संस्थांची बाजू मांडली.

बाधित मिळकतींची अधिसूचना दिवाळीपूर्वी जाहीर करा : आयुक्त

सोलापूर : दोन उड्डाणपुलाच्या भूसंपादनात बाधीत होणाऱ्या बहुतांश मिळकतींचे मूल्यांकन पूर्ण झाले आहे. या मिळकतींची अधिसूचना दिवाळीपूर्वी जाहीर करायला हवी. उर्वरित मिळकतींची अधिसूचना दिवाळीनंतर करा, अशी सूचना महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी भूसंपादन अधिकारी केशव जोशी यांना केली.

जुना पूना नाका ते पत्रकार भवन चौक आणि जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला या दोन उड्डाणपुलाचे भूसंपादन अजूनही पूर्ण झालेले नाही. महापालिका, बांधकाम विभाग, भूमी अभिलेख कार्यालयाकडून वेळेवर समन्वय होत नसल्याने काम संथ गतीने सुरू असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या भूसंपादन कार्यालयाचे म्हणणे होते. मात्र भूसंपादन कार्यालयाचा दावा चुकीचा असल्याचे इतर कार्यालयातील इतर अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, सहायक संचालक नगररचना संभाजी कांबळे, भूसंपादन अधिकारी केशव जोशी, लक्ष्मण चलवादी यांच्यासह भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. कोणत्या कार्यालयाकडून अपुरी माहिती मिळाली, कोणत्या कारणांमुळे भूसंपादनाची अधिसूचना जाहीर व्हायला विलंब लागतोय, असे प्रश्न आयुक्तांनी विचारले.

भूसंपादन अधिकाऱ्यांना आवश्यक ती सर्व माहिती तत्काळ द्यावी, अशा सूचना आयुक्तांनी केल्या. दोन्ही उड्डाणपुलाच्या कामात ज्या मिळकतींचे मूल्यांकन पूर्ण झाले अशा मिळकतींची माहिती जाहीर करायला काय हरकत आहे, असे आयुक्तांनी विचारले. सरकारी जागा, खासगी मिळकतींचे मूल्यांकन पूर्ण झाले असेल तर तत्काळ अधिसूचना जाहीर करण्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांपुढे सादर करा, असे आयुक्तांनी सांगितले. यावर जोशी यांचे कार्यालय काय भूमिका घेते याकडे लक्ष आहे.

सीसीएच ॲपच्या माध्यमातून लाखोंची फसवणूक; तरुणांची फौजदार चावडी पोलीस ठाण्यात धाव

■ अधिकाऱ्यांनीसुध्दा पैसे गुंतवल्याचे समोर

सुराज्य/सोलापूर

सीसीएच ॲपच्या माध्यमातून पैसे गुंतवल्यावर दुप्पट पैसे आणि तेही अमेरिकन डॉलरच्या रूपात मिळतील या आमिषाला बळी पडलेल्या तरुणांनी फौजदार चावडी पोलिसांकडे धाव घेत तक्रार दिली.

सोलापूर शहरातील चौपाड, दत्त चौक, मंगळवेढा तालीम, मुरारजी पेठ, भवानी पेठ आणि इतर ठिकाणच्या तरुणांनी मोबाईलवर ऑनलाईन आलेल्या सीसीएच ॲपवर मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवले होते.हे अमेरिकन ॲप असून त्या ॲपवर पैसे गुंतवणूक केल्यास अवघ्या काही दिवसात दुप्पट, तिप्पट असा परतावा मिळणार आहे असे सांगण्यात आले. त्यानुसार सुरुवातीला काही लोकांनी कमी रक्कम गुंतवली होती त्यांना चांगल्या प्रकारे परतावा मिळाला आणि परतावा मिळालेल्यांनी त्या ॲपची चांगलीच प्रसिध्दी केली त्यावरून अनेकांनी या सीसीएच ॲपवर पैसे गुंतवले. यामध्ये बेरोजगार तरुण, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस, वकील, पत्रकार, छायाचित्रकार, डॉक्टर असे सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी आमिषाला बळी पडून पैशाची गुंतवणूक केली. परंतु गेल्या काही दिवसापासून हे ॲप बंद पडल्याने गुंतवणूक केलेल्यांना त्यांच्या पैशाचा परतावा मिळाला नाही.

आपली फसवणूक झाल्याचे त्यांना समजले असताना त्यांनी एकमेकांकडे विचारणा केली कोणाचे किती गेले ही विचारणा करून शेवटी काही तरुणांनी मंगळवारी सकाळी थेट फौजदार चावडी पोलीस ठाणे गाठले आणि पोलीस अधिकाऱ्यांसमोर त्यांनी त्यांची व्यथा मांडली. अनेकांनी घरातील दागिने गहाण ठेवले, कोणी घरावर,वाहनांवर कर्ज काढले तर कोणी खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे आणून त्या ॲप मध्ये गुंतवले आहे.शेकडो नागरिकांनी या ॲपमध्ये कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली आहे आणि ॲप बंद पडले आहे त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

ही फसवणूक चौपाड येथील चांदीचे दागिने आणि मूर्तिकार अनंत येरंकल्लू आणि जयंत येरंकल्लू या दोघांनी हे ॲप सोलापूरमध्ये आणले आणि त्यांनी सांगितले म्हणून अनेकांनी पैसे गुंतवले असा आरोप काही तरुणांनी पोलिसांकडे केला त्यानुसार त्यांनी तक्रारही दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.या ॲपच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.तसेच यामध्ये अधिकाऱ्यांनी सुध्दा मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवले असल्याची चर्चा सुरू होती.पुढील तपास फौजदार चावडी पोलीस करीत आहेत.

युवा महोत्सव : २३ महाविद्यालयांनी सादर केल्या विविध लघुनाटिका

सुराज्य/मंगळवेढा

अठरावा युवा महोत्सव दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा यांच्यासह २३ महाविद्यालयाने मुख्य रंगमंचावर लघू नाटिका सादर केली. मोबाईल आणि धकाधकीच्या जीवनात माणूस माणूस पण हरवत चालला आहे माणुसकीवर प्रभाव टाकण्यासाठी लघू नाटकेतून युवकांनी प्रयत्न केला. धकाधकीच्या जीवनात माणूस हसणं विसरला आहे. हसणे हे उत्तम आरोग्यासाठी एक टॉनिक आहे.

युवा महोत्सवात उपस्थितांना हसविले. सोबत सामाजिक जनजागृती केली. राज्यासह देशातील राजकारण, दहशतवाद, बेरोजगारी, महागाई, सोशल मीडिया, शेतकरी आत्महत्या, मोबाईलचे दुष्परिणाम, छोटा परिवार ,सुखी परिवार अशा विविध ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकीत दर्जेदार लघुनाटिका सादर करण्यात आल्या. विविध महाविद्यालयाने एका पेक्षा एक दर्जेदार लघुनटिका सादर करून रसिक विद्यार्थ्यांना हसविले आणि ज्वलंत विषयावर जनजागृती करीत विचार करण्यास भाग पाडले. सात रस्ता येतील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाच्या वतीने काळजात रेंज पाहिजे ही लघुनाटिका सादर केली. यामध्ये पर्यावरण, धार्मिक वाद, महागाई, उपासमारी अंधश्रध्दा यासह विविध मुद्यांना स्पर्श करीत लघुनाटिका सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले. श्रीराम इन्स्टिट्यूटने मोबाईलचे दुष्परिणाम यावर भाष्य करीत लघुनाटिका सादर केली. केगाव येथील सिंहगड महाविद्यालयाने जातिवाद ,शेतकरी आत्महत्या, सोशल मीडिया या आधारावर लघुनाटिका सादर करून उपस्थितांची वाहवा वाहवा मिळविली. सांगोला महाविद्यालय सांगोला यांनी विविध मुद्यांवर स्पर्श केला आणि विद्यार्थ्यांचे मनोरंजन करीत लक्षवेधी लघुनटिका सादर केली. वसुंधरा कला व शास्त्र महाविद्यालयाने छोटा परिवार, सुखी परिवार असा संदेश देत कटपुतली लघुनाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्याचबरोबर भारत महाविद्यालय जेऊर ,जुनोनी महाविद्यालय, शंकरराव मोहिते पाटील अकलूज, शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर विद्यापीठ अधिविभाग, संगमेश्वर महाविद्यालय ,सोलापूर, दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा यांच्यासह २३ महाविद्यालयांनी लघुनाटिका सादर केली.

शिवाजी महाविद्यालय बार्शीच्या 'बयास्कोप'ने वेधले लक्ष

श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी या महाविद्यालयाने बयास्कोप ही लघुनाटिका सादर केली. तृतीयपंथी यांची वेशभूषा करून हटके लघुनाटिका सादर करीत उपस्थित रसिक विद्यार्थ्यांना खळखळून हसविले.

नाविंदगी येथे डोळ्यात चटणी टाकून मारहाण | २ महिलांसह चौघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

घरासमोर सांडपाणी सोडू नका. असे सांगितल्याच्या कारणावरून कानशिलात मारल्याने महिलेच्या कानातील फुल रुतून जखमी झाल्या. या संदर्भात विचारणा करण्यासाठी आलेल्याना देखील डोळ्यात चटणी टाकून काठीने मारहाण करण्यात आली.

ही घटना नाविंदगी (ता. अक्कलकोट) येथे रविवारी घडली.या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी २ महिलासह चौघाविरुध्द गुन्हा दाखल केला. यासंदर्भात मायक्का हनुमंत नाविदगी (वय ४०) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. आमच्या घरासमोर सांडपाणी सोडू नका. असे सांगितल्याच्या कारणावरून त्यांच्या घराशेजारी राहणारे मुतन्ना पडनुरे आणि त्याचा भाऊ बाबूशा याने मारहाण केली. त्यावेळी त्यांच्या कानातील फुल रुतून त्या जखमी झाल्या. दुसऱ्या दिवशी त्यांचे भाऊ प्रभूलिंग आणि बहीण शिलवती पिसनाळ यांनी विचारणा केली असता मुतन्ना पडनुरे त्याची पत्नी कनव्वा, बाबुशा आणि त्याची पत्नी रेणुका अशा चौघांनी त्यांना देखील काठीने मारहाण केली. आणि महिलांनी शिलवती यांच्या डोळ्यात चटणी टाकून मारहाण केली.

करमाळा येथील दत्त मंदिरात चोरी

सोलापूर : करमाळा येथील दत्त मंदिराच्या आवारातील विश्वस्तांच्या बसण्याच्या खोलीचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील १२ हजार रुपये पळविले. हीचोरी रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात मंदिराचे विश्वस्त बाळकृष्ण तुकाराम मोहिते (वय ६३ रा.करमाळा) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. ते नेहमीप्रमाणे शनिवारी रात्री मंदीरातील विश्वस्तांच्या खोलीचे दरवाजा बंद करून घरी गेले होते. पहाटेच्या सुमारास चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून खोलीत प्रवेश केला. आणि लाकडी कपाटातील १२ हजार रुपये घेऊन पसार झाला. स.नि. जगदाळे पुढील तपास करीत आहेत.

घर फोडून ८७ हजारांचा ऐवज चोरीला

सोलापूर : दशक्रिया विधीला गेलेल्या महिलेच्या घरातील ८७ हजारांचे सोन्याचे दागिने चोरट्याने चोरून नेले. ही घटना रविवार दि. ९ ऑक्टोंबर रोजी घडली. किर्ती चंद्रशेखर कामत (वय- ३७, रा. २३, सनमान नगर, जुळे सोलापूर) ही महिला तिच्या नंदेच्या पतीच्या दशक्रिया विधीसाठी घराला कुलूप लावून विजापूर रोड सैफूल येथे गेली होती. चोरट्याने तिचे बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला आणि ८७ हजाराचा ऐवज चोरून नेला. तपास स.पो.नि. मुरकुटे करीत आहेत.

कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना महावितरणचा दिलासा

विलासराव देशमुख अभय योजनेस ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सुराज्य/सोलापूर

वीज बिलांच्या थकबाकीपोटी कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांकडील वीजपुरवठ्याच्या पुनरुज्जीवनासाठी महावितरणने विलासराव देशमुख अभय योजना २०२२ ला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेला मिळालेल्या मुदतवाढीमुळे राज्यातील घरगुती ग्राहकांसोबतच व्यवसाय आणि उद्योगांना पुनरुज्जीवनाची संधी मिळून राज्यातील अर्थकारणाला गती मिळेल.३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेनुसार थकबाकीची मूळ रक्कम हप्तेवारीने अथवा एकरकमी भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पूर्णतः माफ़ करण्यात येत आहे. योजनेनुसार ३१ डिसेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित केलेले सर्व बिगर कृषी उच्चदाब आणि लघुदाब ग्राहक या योजनेत पात्र आहेत. योजनेचा कालावधी ६ महिन्यांसाठी (१ मार्च २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत) होता. मात्र, अनेक ग्राहकांनी या योजनेला मुदतवाढ देण्याची विनंती करीत वीजबिल थकबाकी भरण्याची तयारी दर्शविल्याने आता या योजनेस डिसेंबर-२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय महावितरण प्रशासनाने घेतला आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक आणि पात्र ग्राहकांनी ३१ डिसेंबर पर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. थकबाकी एकरकमी भरण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांनी उच्चदाबाच्या वीज जोडणीसाठी मूळ थकबाकीच्या ९५ टक्के किंवा लघुदाबाच्या वीज जोडणीसाठी मूळ थकबाकीच्या ९० टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या ३० दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल.

हप्तेवारीने पैसे भरण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांना पहिला हप्ता हा मुळथकबाकीच्या ३० टक्के आणि सोबतच अर्ज मंजुरीच्या ७ दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर शुल्क भरावे लागेल. भरावयाचा असून उर्वरित रक्कम ठरावीक हप्त्यात महिन्याच्या शेवटी किंवा त्यापूर्वी भरायची आहे.

... तर तो ग्राहक या योजनेतून अपात्र

ज्या ग्राहकांचे अर्ज ३० सप्टेंबर २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज मंजूर केले आहेत त्यांनी ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत थकबाकीच्या ३० टक्क्यांचा पहिला हप्ता किंवा संपुर्ण थकबाकी एकरकमी भरावयाची आहे. हप्तेवारीचा लाभ घेणारा ग्राहक हप्ता भरण्यास अपयशी ठरल्यास तो ग्राहक या योजनेतून अपात्र ठरणार आहे

प्लॅस्टिक विरोधी कारवाई, कचरा वर्गीकरणाचे टार्गेट

सोलापूर : शहरात प्लॅस्टिक विरोधी कारवाई थंडावली आहे. त्याचबरोबर ओला व सुका कचरा वर्गीकरणही आवश्यक तेवढे होत नसल्याने या संदर्भात आता आरोग्य निरीक्षकांना टार्गेट देण्यात येणार आहे. टार्गेट पूर्ण न झाल्यास संबंधित मुख्य अधिकारी व आरोग्य निरीक्षकांवरच थेट कारवाई करण्यात येणार आहे.

सोलापूर शहरात अद्यापही ओला आणि सुका कचरा वर्गीकरण आवश्यकतेनुसार करून घेतला जात नाही. अशावेळी कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. प्लॅस्टिक विरोधी कारवाईतही झाली आहे. दंडात्मक कारवाईचे निर्देश देखील देण्यात आल्यानंतर गेल्या महिन्यापासून कारवाईची ही मोहीम थंडावली आहे. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत पथकाने जुलै महिन्याच्या तुलनेत ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांमध्ये तपासणी व कारवाईचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. या तीन महिन्याच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यामध्ये सर्वात कमी केवळ ६१ दुकानांची तपासणी तर अवघ्या १२ दुकानांवर दंडात्मक कारवाई व फक्त २९ किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले आहे. प्लॅस्टिक विरोधी कारवाई मोहीम थंडावली.

माहे जुलै २०२२ मध्ये ३१ दिवसात महापालिकेच्या ८ झोन अंतर्गत ७५ आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करत ४ लाख ३० हजार रुपये दंड वसुली करण्यात आली. या महिन्यात सर्वात कमी तपासणी व कारवाई झाली आहे. याची गांभीर्याने दखल येत महापालिका आयुक्तांनी प्लॅस्टिक विरोधी कारवाई व कचरा वर्गीकरणासाठी आरोग्य निरीक्षकांना यापुढे टार्गेट देण्यात येईल, टार्गेट पूर्ण न झाल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचे स्पष्ट केला आहे.

टार्गेटची पूर्तता न झाल्यास कारवाई : आयुक्त

संबंधित विभाग आणि आरोग्य निरीक्षक यांना टार्गेट देण्यात येणार असून या टार्गेटची पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी आणि आरोग्य निरीक्षकांवरच थेट कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

मशाल पेटवून ठाकरेंच्या शिवसेनेने केले नव्या चिन्हाचे स्वागत

'मशाल पेटली... महाराष्ट्रात घुसली'; शिवसैनिकांच्या घोषणा

सुराज्य/सोलापूर

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नव्या नावा सह 'मशाल' या नव्या चिन्हाचे स्वागत मंगळवारी सोलापुरात जल्लोषात केले. पद्मशाली चौकात शहरप्रमुख विष्णू कारमपुरी यांच्या कार्यालयासमोर ढोल - ताशे वाजवत नव्या चिन्हाचे स्वागत करण्यात आले.

प्रारंभी शिवा ढोकळे आणि सहकारी शिवसैनिकांनी श्रीक्षेत्र तुळजापूर येथून प्रज्वलित करून आणलेल्या मशालीचे पूजन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर गणरायाची आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी 'मशाल पेटली... महाराष्ट्रात घुसली' च्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी ढोल - ताशांच्या गजरात भगवे फेटे बांधून भगवे शेले परिधान केलेल्या शिवसैनिकांनी जल्लोष केला. तसेच शिवसैनिकांनी मिठाई वाटून आनंद व्यक्त केला.

यावेळी जय भवानी जय शिवराय, मशाल पेटली महाराष्ट्रात घुसली, आली रे आली मशाल आली, या गद्दारांचं करायचं काय खाली डोकं वर पाय अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, उपजिल्हाप्रमुख अमर पाटील, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय वानकर, उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, शहर संघटक अतुल भवर, महिला आघाडीच्या शहरप्रमुख भक्ती जाधव, प्रा. अजय दासरी, विद्यार्थी सेनेचे लहू गायकवाड, उपशहरप्रमुख संजय साळुंखे, उपशहरप्रमुख बाळासाहेब गायकवाड, उपशहरप्रमुख रेवण पुराणिक, उपशहर प्रमुख सुरेश जगताप, उपशहर प्रमुख रेवण बुक्कानुरे, उपशहर प्रमुख अनिल कोंडुर, शिवसेना वैद्यकीय कक्षाचे शहर संघटक रविकांत गायकवाड, युवा सेना जिल्हा सचिव मुनिनाथ कारमपुरी, प्रशांत जक्का, निरंजन बोद्दुल, मंगेश श्रीखंडे, सचिन गंधुरे, विभाग प्रमुख शिवा ढोकळे, तुषार आवताडे, अनिल दंडगुळे, दिनेशसिंग चव्हाण, विजय पुकाळे, विठ्ठल कुराडकर, सुरेश तेली, रेखा आडकी, राधा आवार, क्षीरसागर, गुरुनाथ कोळी आदी उपस्थित होते.